# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

शनिवार, १५ जून २०२४

⊙ किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

⊙ मराठी ⊙ दैनिक

⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - २८३

⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SATURDAY 15 JUNE 2024 | adhunikkesari.com | ●YEAR-03 ●ISSUE-283 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-05


# जनतेतील संभ्रम दूर होईपर्यंत स्मार्ट मीटर लागणार नाही

## चंद्रशेखर बावनकुळे यांची माहिती

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : स्मार्ट मीटरचा निर्णय उद्धव ठाकरे सरकारनेच घेतला आहे. जोपर्यंत जनतेच्या मनातील संभ्रम दूर होत नाही तोपर्यंत कुठल्याही सर्वसामान्य व्यक्तीच्या घरात स्मार्ट मीटर लागणार नाही, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले आहे, अशी माहिती भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुक्रवारी दिली. दादर येथील वसंत स्मृती कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.**

यावेळी प्रदेश उपाध्यक्ष (मुख्यालय) माधव भांडारी, खा.डॉ. भागवत कराड, खा. मेधा कुलकर्णी, प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी उपस्थित होते. पुढे बोलताना बावनकुळे म्हणाले की, लोकसभा निवडणूक प्रचारात मविआ, इंडी आघाडीने खोट्या नरेटिव्हद्वारे जनतेची दिशाभूल करून दलित, आदिवासी समाजाची मते मिळवली. हा अपप्रचार खोडून काढण्यासाठी भारतीय जनता पार्टीचे नेते, कार्यकर्ते आगामी काळात समाजातील शेवटच्या घटकापर्यंत जाणार आहेत. विरोधकांना उघडे पाडून आगामी विधानसभा निवडणुकीत, स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत नव्या जोमाने काम करून महायुती प्रचंड मताधिक्याने विजयी होईल, असा विश्वासही बावनकुळे यांनी व्यक्त केला. बावनकुळे म्हणाले की, लोकसभा निवडणूक निकालाबाबत विचार करण्यासाठी प्रदेश पदाधिकारी, लोकप्रतिनिधींची बैठक शुक्रवारी झाली. या बैठकीत घरोघरी जाऊन मविआ, इंडी आघाडीचा खोटा प्रचार जनतेपर्यंत नेऊन मतदारांच्या मनातील गैरसमज दूर करण्यासाठी प्रयत्न करण्याचा निर्णय घेण्यात आला. मोदी सरकारने मागच्या 10 वर्षांत जातपात, धर्म यापलिकडे जाऊन केलेला सर्वसमावेशक विकास, आगामी पाच वर्षांत मोदी सरकारचे विकसित भारताचे लक्ष्य जनतेपर्यंत पोहोचवणार आहोत. आगामी काळात महाराष्ट्रातील 48 लोकसभा मतदारसंघांमध्ये भाजपाचे 48 नेते भेट देऊन जनतेच्या मनातील गैरसमज दूर करणार आहेत. तसेच नवमतदार नोंदणी अभियानही हाती घेतले जाणार आहे. केवळ दलित व मागास वर्गाचीच नव्हे तर विरोधकांनी महिलांचीदेखील फसवणूक केली. महिलांच्या खात्यात दरमहा 8,500 रुपये 'खटाखट' जमा होतील, असे खोटे आश्वासन देऊन महिलांना भुलवले. आता विरोधकांच्या खासदार आणि नेत्यांच्या घरासमोर 8,500 रुपयांच्या मागणीसाठी महिलांची झुंबड उडल्याचे आपण बघतोच आहोत, असेही बावनकुळे यांनी सांगितले. संविधानाला सर्वोपरी मानत संविधानासमोर नतमस्तक होऊन भाजपा-एनडीए सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळाची सुरुवात करणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कोणाच्याही आरक्षणाला धक्का न लावता विकसित भारत घडवण्यासाठी कटिबद्ध असल्याचे वारंवार सांगितले होते. विरोधकांनी खोटेनाटे पसरवून मागास आणि दलितांच्या मनात भय पसरवले. मात्र आता कुठल्याही प्रकारचे भय त्यांच्या मनात नसल्याचे बावनकुळे म्हणाले.

# अजित पवारांच्या क्लीन चिटला अण्णांचा विरोध

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** शिखर बँक घोटाळा प्रकरणातल्या अतिरिक्त क्लोजर रिपोर्टला ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे आव्हान देणार आहेत. अजित पवार यांना दिलेल्या क्लीन चिटला अण्णा हजारे विरोध करणार असून त्यासंदर्भात त्यांनी कोर्टात धाव घेतली आहे. अण्णा हजारे आणि माणिकराव जाधव यांच्या वकिलांनी पोलिसांच्या अतिरिक्त क्लोजर रिपोर्टवर आक्षेप घेतला आहे. न्यायालयाने हा आक्षेप मान्य करत निषेध याचिका दाखल करण्यास अण्णा हजारे आणि माणिकराव जाधव यांच्या वकिलांना वेळ दिला आहे. तर 29 जूनला पुढची सुनावणी होणार आहे. मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने अजित पवार आणि इतरांना क्लीन चिट दिली आहे.

राज्यातील बहुचर्चित तब्बल 25 हजार कोटी रुपयांच्या शिखर बँक घोटाळ्या प्रकरणी उपमुख्यमंत्री अजित पवार, त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार आणि इतर आरोपींच्या अडचणी वाढल्या होत्या. पण मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेनं (इओडब्ल्यू) दिलासा दिला. तसेच, या घोटाळ्या प्रकरणी कोणतेच पुरावे नसल्याचं पोलिसांनी म्हटलें. त्यामुळे या प्रकरणातील सर्व दोषींना दिलासा देण्यात आला. ऐन लोकसभा निवडणुकीच्या धामधुमीत अजित पवार यांच्यासह सुनेत्रा पवार यांना देखील या प्रकरणी दिलासा देण्यात आलेला. पोलिसांनी या प्रकरणी जानेवारी महिन्यात क्लोजर रिपोर्ट सादर केला होता. बँकेच्या कर्ज वाटप आणि साखर कारखाने विक्रीत अनियमितता असल्याचे आरोप अजित पवार आणि इतर आरोपींवर करण्यात आलेले. क्लोजर रिपोर्ट सादर करतांना कर्ज वाटप आणि साखर कारखाने विक्री संबंधी बँकेला नुकसान झाल्याचे कोणतेच पुरावे नसल्याचे आर्थिक गुन्हे शाखेने म्हटले आहे.

## देवराव आहेर व पंडित खरात अँटी करप्शन बोर्डमध्ये निवड झाल्याबद्दल

**हार्दिक शुभेच्छा**



देवराव आहेर





पंडित खरात

# बेजबाबदार सरकारमुळे स्फोटांची मालिका सुरूच


## चामुंडी दुर्घटनास्थळी वडेट्टीवार यांनी भेट देऊन केली पाहणी


आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** औद्योगिक सुरक्षेवर लक्ष ठेवणारी यंत्रणा आहे कुठे ? हा प्रश्न चामुंडी दुर्घटनेमुळे निर्माण होत आहे. गेल्यावर्षी देखील नागपूर येथील कंपनीत स्फोट होवून झालेल्या दुर्घटनेत निष्पाप कामगारांचा जीव गेला होता. डोंबिवली एमआयडीसीमधून दर आठवड्याला स्फोट होवून अपघात होण्याच्या बातम्या येत आहे. सतत या घटना घडत असताना सरकार आणि प्रशासकीय यंत्रणा याकडे गांभीर्याने लक्ष देत नाही. सतत होणारे हे अपघात मानवी चूक नसून पूर्णपणे सरकार आणि प्रशासन यामध्ये दोषी असल्याचा हल्लाबोल विधानसभा विरोधीपक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. त्याचबरोबर चामुंडी दुर्घटनेला जबाबदार असणाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, शासनाची तसेच संबंधित कंपनी व्यवस्थापनाची मदत तात्काळ देण्यात यावी, अशी मागणी देखील वडेट्टीवार यांनी केली आहे. नागपूर जवळील धामणा येथील स्फोटके बनवणाऱ्या चामुंडी कंपनीत झालेल्या दुर्घटना स्थळी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी आज भेट दिली. या भेटीनंतर श्री. वडेट्टीवार बोलत होते.

यावेळी काँग्रेस नेते सुनील केदार, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते अनिल देशमुख आणि रामटेकचे खासदार श्यमकुमार बर्वे उपस्थित होते.वडेट्टीवार म्हणाले की, अकुशल कामगारांच्या हाती ५०० किलो स्फोटके देणे, काम सुरू असताना वरिष्ठ उपस्थित नसणे, स्फोटक असलेल्या ठिकाणी विशेष काळजी घेतली न जाणे, सुरक्षा पोशाख, सेफ्टी शूज अशी सुरक्षा साधने कामगारांना उपलब्ध न करून देता त्यांना काम करायला लावणे या बेजबाबदारपणाला कंपनी व्यवस्थापनासोबतच सरकारची प्रशासकीय व्यवस्था सुद्धा जबाबदार आहे. स्फोट झाल्यानंतर जखमींना तात्काळ मदत मिळणे आवश्यक असताना दीड तासाने रुग्णवाहिका मदतीला पोहचते हा अक्षम्य बेजबाबदारपणा आहे. यामुळे निष्पाप कामगारांचा जीव गेला आहे. कंपनीच्या व्यवस्थापनाकडे फक्त जाब मागून स्वतःला वाचवण्याचा प्रयत्न सरकारने आणि प्रशासकीय यंत्रणेने यावेळी करू नये. राज्याचे औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय कुठे झोपी गेले याचे उत्तर सरकारने द्यावे.



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

## चांदणे शब्दफुलांचे...

याच पुण्यात लोकमान्य टिळकांनी बालगंधर्वांचं गाणं ऐकलं. त्यांचा अभिनय आणि गायकी पाहून लोकमान्यांनीच त्यांना ' बालगंधर्व ' हा किताब दिला. जसे बाळ गंगाधर टिळक हे ' लोकमान्य ' म्हणूनच प्रसिद्धी पावले तसेच त्यांनी ज्यांचा बालगंधर्व म्हणून उल्लेख केला ते नारायण श्रीपाद राजहंस ' बालगंधर्व ' म्हणूनच जगद्विख्यात झाले. कोण होते हे बालगंधर्व ? रंगभूमीवरील गायक ? नट ? स्त्री भूमिका करणारे कलाकार ? हे सगळे तर ते होतेच पण बालगंधर्व म्हणजे रंगभूमीवरचं मूर्तिमंत सौंदर्य ! रंगभूमीला पडलेले सर्वात सुंदर स्वप्न म्हणजे बालगंधर्व ! रंगभूमीला जर मानवी अवतार घेऊन काही सांगायचे झाले असते तर ती निःसंशय बालगंधर्वांच्या रूपानेच आपले मनोगत व्यक्त करती झाली असती. बालगंधर्व ज्या पद्धतीने रंगभूमीवर वावरले त्याला तोड नाही. ज्या काळात स्त्रियांनी रंगभूमीवर काम करणे कमीपणा मानला जात असे त्या काळात त्यांनी रंगभूमी आपल्या स्त्री भूमिकेने अलंकृत केली. त्यांनी ज्या काही स्त्री भूमिका केल्या त्यात त्यांचे वागणे, बोलणे, चालणे, हसणे, लाजणे या सगळ्या गोष्टी इतक्या अप्रतिम होत्या की त्या भूमिका तेवढया ताकदीने साकारणे एखाद्या स्त्री कलाकाराला देखील शक्य झाले नसते. आचार्य अत्रे त्यांच्या स्त्री भूमिकांबद्दल बोलताना म्हणाले होते पुरुषाने केलेल्या स्त्रीच्या सर्वात सुंदर भूमिका म्हणजे बालगंधर्वांच्या भूमिका. स्त्री वेशात एवढा सुंदर पुरुष कधीच दिसला नव्हता. गायन म्हणजे ज्यांचा आत्मा होता अशा भास्करबुवा बखलेंचे शिष्योत्तम म्हणजे बालगंधर्व. बालगंधर्व म्हणजे महाराष्ट्रातील सुरांचे साक्षात कैलास लेणे ! बालगंधर्वांनी सूरांचाच मळा फुलवला. सूरच पेरले. सुरांचं अमाप पीक आलं. ते पसा पसा भरून रसिकांना वाटत राहिले. ही ओंजळ कधीही रिकामी झाली नाही.

' आपुलकी ' या पुलंच्या पुस्तकात बालगंधर्वांवर एक लेख आहे. मला वाटतं हा लेख लिहिताना पुलंच्या लेखणीने नेहमीची नर्मविनोदी शैली सोडून ज्ञानेश्वर माऊलींच्या ' मोगरा फुलला ' सारखी सुंदर सुगंधी शब्दफुलांची बरसात केली. एखादे कारंजे मनमोहक अशा पद्धतीने थुई थुई नाचत असताना अशा या कारंजाखाली आपण बसलो की त्याचे तुषार आपल्यावर अमृतजलाचा जो शिडकावा करतात, त्या वर्षावात तो लेख वाचताना मी जणू न्हाऊन निघालो.



## गोरक्षनाथ

आधुनिक केसरी

संयमपूर्ण जीवन व साधी राहाणी यांचा ते आदर्शच होते. 'श्री गोरक्ष प्रवाह' ग्रंथ पारायण, एक प्रभावी उपासना मनात एखादी इच्छा



धरुन निश्चयानें ग्रंथपठण केल्यास, मनोकामना खात्रीनें पूर्ण होते, पूर्वेकडे तोंड करून, एखाद्या मऊ वस्त्राच्या आसनावर बसून ग्रंथ पठण करावे. लाकडी पाट बसावयास घेऊं नये. घेतल्यास, पाटावर वस्त्र घालून त्यावर बसावे. समोर चौरंग किंवा पाट ठेवून, त्यावर ग्रंथ ठेवावा, व पूजा करून नित्य वाचन करावे. समोर किंवा उजव्या हाताला श्रीदत्तात्रेयांची तसबीर असावी तसबीर शक्य तर भिंतीस टांगावी जमिनीवर, ठेवूं नये. ग्रंथात सांगितल्याप्रमाणे गुरुवारी आरंभ करून रोज रात्री एकदां संपूर्ण ग्रंथ वाचून आरती करावी. या ग्रंथाचा एक पाठ पूर्ण होण्यास अर्ध्या तासापेक्षाही कमी वेळ लागतो. तेवढी सवड काढून नित्य ग्रंथपठण करुन, नाथांचा प्रसाद भाविक जनांनी मिळवावा, हीच श्रीदत्तचरणी प्रार्थना. श्री दत्तात्रेय-गोरक्ष संवाद श्रीशैल ह्या नावाचा अर्थच मुळी "देवीचा पर्वत" असा आहे. तेथील ज्योतिर्लिंगही प्रसिद्धच आहे. जटाजुट, भस्म, रुद्राक्ष अशी त्यांची अवधूतमूर्ती वैराग्याचे साक्षात प्रतीक. त्रिदेवांचा अंश असलेल्या भगवान दत्तात्रेयांनी आपल्या मातेला अजपा साधनेचा उपदेश केला होता.

## देहान्तनिरूपण

आधुनिक केसरी

मित्रांनो बघा मग आपण कलीयुगात वावरणारी माणसं आहोत तेव्हा या षडरिपूपासून मुक्त व्हायचं असेल तर संतवचनाचा सतत अभ्यास केला पाहिजे हे पूर्णपणे सत्य आहे.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

प्राण,मन, बुध्दी, अहंकार व वासना हे सर्व सुक्ष्म देहाचे घटक आहेत. तर कातडी, रक्त, हाडे, मज्जातंतु, ग्रंथी,नसा ह्या सर्व सुक्ष्म देक्षाचे घटक आहेत .स्थूल देहात काय किंवा सुक्ष्म देहात काय वासना हा घटक दोन्ही मध्ये असतोच.वासना हा प्रधान घटक आहे. सुक्ष्म देहाला वासनात्मक देह असे दुसरे नाव आहे. वासना ही वायु रूपात असते. ती इंद्रियांना गोचर होत नाही. पण वासना ही जीवाला नवे नवे जन्म घ्यायला लावते. मित्रांनो या ठिकाणी आपल्याला समजण्यासाठी समर्थांनी काही संस्कृत सुभाषिते दिली आहेत.



आधुनिक केसरी

## अभंगची आस | विठु आम्हा ||


अभंगाच्या गावी | रमतो विठ्ठल ||
अनुभवी बोल | गातो तुका ||१||
भावाचा मृदुंग | भक्तीची चिपळी ||
ब्रह्मानंदी टाळी | एकरूप ||२||
अभंगाचा सूर | आत्म्याचे बोलणे ||
कैवल्याचे गाणे | ऐके विठु ||३||
ताल सूर आम्हा | नसे ज्ञात काही ||
गोड नाम घेई | निरंतर ||४||
अभंगची श्वास | अभंगची ध्यास ||
अभंगची आस | विठु आम्हा ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८



## हितगुज



पुष्प ९०वे

गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)


### चिंतन सणवारांचे

आपल्या भारताचे महत्त्व, प्रतिष्ठा तीन प्रकारची आहे. भौगोलिक भारत, चिरंतन भारत व चैतन्यमय भारत. या तिन्हींच्या सामंजस्याने भारतीयता व भारतीय संस्कृतीचे महत्त्व ध्यानी येते. भारताचा भूगोल, निसर्ग विविध रूपात्मक आहे. 'चिरंतन' भारताचा अखंडित इतिहास आहे. 'चैतन्यमय' भारताची श्रेष्ठ मूल्ये, आदर्श, संस्कृतीचे महत्त्व ध्यानी येते. आपल्या खेडे, शहरातून वसलेला भारत, आपली कृषी, माळराने, पर्वत, मैदाने, दर्याखोरे, नद्या-झरे, समुद्र उर्वरित दोन भारतीय अस्मितांशी जोडलेला आहे. म्हणूनच रोजच्या जीवनशैली इतकेच भाषा, साहित्य, कला, संस्कृती, परंपरा, ज्ञान-विज्ञान या सर्वांचे भारतीय मनाशी अतूट नाते आहे. सामान्य माणूस-उत्सव, कुलाचार-कुलधर्म, सणवार, संगीतादि कला-आविष्कार यांच्याद्वारे लोक-उत्सव चैतन्यमय भारताची ओळख करून घेत असतो. ही ओळख भारतीय माणसाची अभिरूची वाढवते. तसेच संस्कृतीचा बोध करून देते. सणवारांच्या संदर्भात लिहितांना आजच्या वातावरणातील उदासिनता या सर्वांचा पुन्हा विचार करायला भाग पाडते. सणवार फक्त परंपरेचे पालन नाही किंवा जीवनाचा अर्थ स्पष्ट केला जातो. प्रत्येक सणाला ऋतुसंगती आहे. त्यानुसार आयुर्वेदाची आरोग्य बैठक आहे. प्रत्येक सणाला पारिवारिक, सामाजिक मूल्यांची जोड दिलेली आहे. तन-मन-बुद्धी यांच्यावर सुसंस्कार करून भाव-विचारांना उदात्त दिशा देण्यासाठी, मनाला ताजेतवाना करणारा आनंद मिळवण्यासाठी सणांचे नियोजन आपल्या द्रष्टया पूर्वजांनी केले आहे. उच्च, पवित्र संकल्पांच्या गुढ्या उभारण्यापासून सुरू झालेले वर्ष वाईट, अमंगळ, दोष भस्मसात करण्याच्या निर्धार-कृतीने संपते. हा मनाचा आंतरिक विकास घडवणारा प्रवास आहे. होळीचा सण वसंताच्या मधुर आगमनाने प्रफुल्लित झालेला असतो. हा अग्नीपूजेचा व रंगांच्या उधळणीचा सण आहे. शिशिरात वठलेल्या निष्पर्ण वृक्षांना पालवी येते. सगळीकडे हवेची प्रसन्नता व उमललेल्या फुलांच्या सुगंधाची लयलूट असते. अग्नी चैतन्य व प्राण आहे. अग्नी जिवंततेचे स्पंदन आहे. अग्नी रुद्र आहे. अग्नी विरागी आहे. अग्नी विनाशक ही आहे. भारताने क्षुद्र वस्तू, हानिकारक पदार्थ व अधःपतनकारी प्रवृत्तींना सुधारून मनुष्योचित बनवले आहे. सत्यनिष्ठा हा भारताचा मुख्य गुणधर्म आहे म्हणून प्रत्येक गोष्टीला शिवत्वात बघणे, सुंदरतेने अनुभवणे ही भारताची प्रवृत्ती आहे. होळी दुर्गुण व दुष्प्रवृत्तींचा विनाश करायला प्रवृत्त करणारा सण आहे. संकीर्णता, प्रतिगामिता, दुराग्रह, पूर्वग्रह, अंधश्रद्धा, उच्छृंखलता, निरंकुशता, अनाचार, अत्याचार, स्वार्थ, एकांगिता, अहंकार, उन्मत्तता, कपट, कारस्थाने, शत्रुत्व, कलह, भेदभाव, दमन, इत्यादी अमानवीय प्रवृत्तींची, विचारांची होळी करून पश्चातापाची धुळवड करावी. होळीला खूप लाकूड जाळून पर्यावरणाचा र्हास करण्यापेक्षा तिचा खराखुरा अर्थ समजून घ्यावा. सद्विचारांचा, सद्भावनांचा अग्नी नेहमी प्रज्वलित राहील याचे भान ठेवावे म्हणजे सुखाची, ज्ञानाची पौर्णिमा साजरी होईल.

## नाम आणि सत्कर्म

आधुनिक केसरी

नाम हा सत्कर्माचा पाया आहे तसाच कळसही आहे. भगवंताच्या स्मरणात केलेले कर्मच सत्कर्म या सदरात पडू शकते; भगवंताच्या विस्मरणात केलेले कर्म सत्कर्म ठरू शकत नाही. समजा, एखादा मनुष्य नुसते तोंडाने ' राम, राम ' म्हणतो आहे परंतु भगवंताच्या स्मरणात नाही, तर मग ' राम, राम ' म्हणण्याची त्याची क्रिया सत्कर्म म्हणता येईल का ? वास्तविक, नाम हे स्वतःसिद्ध असल्याने ते जाणता वा अजाणता म्हटले तरी ते सत्कर्म याच सदरात पडते, कारण ' जेथे माझे नाम तेथे मी पुरुषोत्तम ' असे भगवंताचेच वचन आहे. म्हणून नामाचा उच्चार आणि भगवंत या दोन गोष्टी निराळ्या असूच शकत नाहीत. मुखाने नाम म्हणणाऱ्याचे लक्ष भगवंताकडे असो वा नसो, ते सत्कृत्य याच सदरात पडते. इतर कर्मे आणि नाम घेण्याचे कर्म यांत जो मोठा फरक आहे तो हाच की, इतर कर्मांना पूर्णत्व किंवा सत्यत्व नामाने येते, तर उलटपक्षी नाम आणि अपूर्णत्व या गोष्टी एकत्र संभवतच नाहीत. म्हणून नाम भगवंताच्या स्मरणात घेतले किंवा




कसे हा प्रश्नच उद्‌भवत नाही. किंबहुना, नाम मुखी आले की सत्कर्मे होऊच लागतात. मूल झाले की मुलाच्या आईला पान्हा फुटणे, मुलाचे लाड करणे, त्याच्यावर सर्वतोपरीने प्रेम करणे, या गोष्टी जशा न शिकविता सहजच होतात, तशीच स्थिती नाम घेणाऱ्याची सत्कर्माच्या बाबतीत होते. इतकेच नव्हे तर, त्या आईला जर म्हटले की तू मुलाला जवळ ठेव, पण त्याच्यावर प्रेम वगैरे काही करू नकोस, तर ते जसे तिला शक्य नाही, त्याचप्रमाणे नाम घेणाराला सत्कर्मे टाळू म्हटले तरी टाळता येणार नाहीत. सत्कर्मे फळाला आली असे केव्हा म्हणता येईल, तर भगवंताचे नाम मुखी येईल तेव्हाच. परमात्म्याने आपल्याला सांगून ठेवले आहे की, '' तू माझा व्हावास असे तुला वाटते आहे ना ? मग तू प्रपंच अती दक्षतेने कर, प्रयत्नाला कधी मागे पाहू नकोस, पण फळ देणारा मी आहे ही भावना ठेवून तू वाग. जी परिस्थिती येईल त्यात समाधान बिघडू देऊ नकोस, आणि मी जे सांगतो ते औषध घे, ते तुला सर्व रोगांतून मुक्त करील; आणि ते औषध जर कोणते असेल तर ते माझे ' नाम ' हे होय. '' त्या नामाचा खरोखर तुम्ही अभ्यास करा. तुम्ही सर्वांनी असा निश्चय करा, की नामाशिवाय जगणे हे खरे नाही. नामाशिवाय जगू नये असे मला खरोखर मनापासून वाटते. नामावरची निष्ठा कसे काम करते हे निष्ठेने नाम घेणारालाच कळेल. नामाचे प्रेम ज्याला लागले त्याच्या मागे परमात्मा उभा राहिला हे अगदी सत्य, सत्य, त्रिवाचा सत्य सांगतो. म्हणून आवडीने आणि प्रेमाने भगवंताचे नाम घ्या, एकदा तरी त्याला कळकळीने 'रामा! ' अशी हाक मारा, की भगवंताला तुम्हाला येऊन भेटावेसे वाटले पाहिजे.

**१३. सत्कर्माचा शेवट भगवंताच्या नामाचे प्रेम उत्पन्न होण्यातच होणे जरूर आहे.**

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

परे भेद है वेद ते, ना चहुँ योगन साध । प्रकृति ब्रह्म अरु जीव का, वादन जाल अगाध ।।३३।। द्वैतवाद कोई कहैं, कोइ अद्वैतहि ज्ञान । कोइ विशिष्टाद्वैत को, अंशि अंश कोइ मान ।।३४।।(स्वर्वेद षष्ठ मण्डल षष्ठ अध्याय) ०६/०६/३३,३४ मूळ भाष्याचा मराठी अनुवाद : ब्रह्मविद्येचे भेद-साधन हे वेदांच्या वाचक ज्ञानाहून पृथक्, क्रियात्मक आहे. हा चेतन योग, राजयोग, हठयोग, मंत्रयोग आणि लययोग या चारही प्राकृतिक योगांहून भिन्न आहे. संपूर्ण विश्वात अनेक संप्रदाय, वाद (द्वैत, अद्वैत, विशिष्टाद्वैत वगैरे) तसेच दर्शन फोफावले आहेत, ज्यांच्या द्वारे प्रकृती, ब्रह्म आणि आत्म्याबद्दल भिन्न-भिन्न विचार-विमर्श उपस्थित केले गेले आहेत, जे एकमेकांहून वेगळे , विरोधी मत मांडतात. हे सर्व वाद आणि विचार मन बुद्धीच्या आधारावर कल्पना विलासाने निर्मित आहेत. सत्य ज्ञानाचा अनुभव नसल्याने, हे सर्व एकमेकांच्या विरुद्ध मत मांडतात.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शनिवार, १५ जून २०२४
adhunikkesari.com

# मुधलवाडीत केमिकलयुक्त पाण्याची पाहणी

## दूषित पाण्यामुळे पिके येत नसल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान

आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**

**पैठण :** तालुक्यातील मुधलवाडी एम.आय. डी.सी. येथील जवळपास १५ कंपनीने सांडपाण्याचे नियोजन योग्य पद्धतीने न केल्यामुळे मुधलवाडीतील कपन्याशेजारील वापरात असलेल्या विहिरीला पिवळे पाणी येवू लागल्याने गेल्या दहा वर्षांपासून या परिसरातील शेतकरी केमीकलयुक्त पाण्यामुळे पिके पिकत नसल्याने आर्थिक नुकसानीचा सामना करत आहे.

केमिकल युक्त पाणी कंपनीच्या बाजूला असलेल्या शेतात गेल्याने अनेक शेतकऱ्यांची जमीन बाधीत होवून फळबाग व खरिप पिकांचे मोठे नुकसान झाले असल्याची ओरड येथील शेतकऱ्यांनी केली आहे. यासंदर्भात येथील शेतकऱ्यांनी या संदर्भातील विविध शासनाच्या विभागाला पत्र व्यवहार करून कळवले पण काहीच उपयोग होत नव्हता परंतु स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या माध्यमातून मुधलवाडीतील शेतकर्यांना एकत्र करत अंदोलन उभारून वेळोवेळी दै. आधुनिक केसरीच्या माध्यमातून वृत्त शासनापर्यंत पोहचल्यावर १० एप्रिल २०२४ रोजी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ मुंबईचे सदस्य सचिव डॉक्टर ढाकणे यांनी मुद्दलवाडी येथील शेतकऱ्यांना भेटी घेवून एम.आय. डी.सी. पैठण येथील केमिकल कंपन्यांच्या दूषित पाणी मुदलवाडी येथील शेतकऱ्यांच्या विहिरीमध्ये आजही येत असल्याचे चित्र प्रत्यक्ष पाहणी अंती दिसुन आल्यावर. महाराष्ट्र राज्याचे प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव मुद्दलवाडी येथे येऊन प्रत्यक्ष शेतकऱ्याच्या विहिरीच्या पाण्याची पाहणी केली व लगेच त्यांनी औरंगाबाद येथील प्रदूषण नियंत्रण मंडळाचे वरिष्ठ अधिकारी यांना विहिरी दूषित पाण्याबाबत जॉब विचारला तसेच डॉक्टरने औरंगाबाद येथील अधिकाऱ्यांना तंबी दिली इतके पाणी खराब झाले असून शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे याबाबत केमिकल कंपन्यांना दंड आकारून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई आजपर्यंत का दिली नाही असे डॉक्टर ढाकणे यांनी औरंगाबादचे वरिष्ठ अधिकारी यांना सुनावले व शेतकऱ्यांना आश्वासन दिले तुमचा प्रश्न लवकरच मार्गी लावतो व या एमआयडीसी मधील कंपन्या केमिकल कंपन्यांना दंड करून तुम्हास नुकसान भरपाई देण्याचा प्रयत्न करू असे आश्वासन दिले. परंतु अधिकारी कंपन्याना मँनेज होत असल्याने हे प्रकरण आता राष्ट्रीय हरित लवाद या न्यायालयीन प्रकरणामध्ये



मंगल विष्णू बोडखे व इतर ४ विरुद्ध म्याट्रीक्स लाइफ साइन्स प्रा.लि. च्या न्यायालीन निर्देशानुसार पिकाचे व जमिनीच्या नुकसानी संदर्भात समिती गठीत करणेबाबत राष्ट्रीय हरित लवाद , वेस्टर्न झोन बेंच , पुणे यांचा दावा क्र . २२२ / २०२३ ( WZ ) दि . २२.०४.२०२४ . २. प्रादेशिक अधिकारी , महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ , छत्रपती संभाजीनगर यांचे पत्र जा . क्र . / म.प्र . नी . मं / प्रा . का . औ . / ७४७ दि .० ९ .०८.२०२३ . ३. मा . जिल्हाधिकारी , छत्रपती संभाजीनगर यांचे समिती गठीत पत्र जाक्र . / जि.अ. क्र.अ. / तंत्र / २४२१ , दि . १०.६२०२४ उपरोक्त संदर्भीय विषयान्वये मौजे मुधळवाडी, ता. पैठण येथील मंगल विष्णू बोडखे व इतर ४ यांच्या शेतजमीनीतील विहिरीचे पाणी दुषित होणे , शेतजमीन व पिकाचे नुकसान झाल्यामुळे झालेल्या तक्रारीसंदर्भात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, छत्रपती संभाजीनगर यांच्या अधिका - यांना पाहणी करून विहिरीच्या पाण्याचे नमुने संकलित करून विश्लेषण करून अहवाल सादर करण्यासाठी तथापि मंगल विष्णू बोडखे व इतर ४ विरुद्ध मॅट्रीक्स लाइफ साइन्स प्रा. लि. या मा. राष्ट्रीय हरित लवाद, वेस्टर्न झोन बेंच, पुणे या न्यायालयीन प्रकरणामध्ये शेतजमीनीतील विहिरीचे पाणी दुषित होणे, पिकाचे व शेतजमिनीच्या झालेल्या नुकसानीच्या संदर्भात पाहणी करून अहवाल तयार करण्यासाठी त्रिसदस्यीय समिती गठीत करण्याच्या संदर्भीय सुचना नुसार त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात आली असुन नुकसान झालेल्या क्षेत्रावर दि . १४.०६.२०२४ रोजी प्रत्यक्ष भेट देवून प्रक्षेत्र पहाणी करू वास्तविक अहवाल सादर करण्याच्या हरित लवादाच्या आदेशानुसारजिल्हाधिकारी , छत्रपती संभाजीनगर ( श्रीमती नीलम बाफना 3. वि . अधि . पैठण / फुलंब्री ) २. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी ,देशमुख छत्रपती संभाजीनगर, ३. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण बोर्ड ( CPCB ) . विभाग पुणे 4. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, छत्रपती संभाजीनगर 5. वरिष्ठ भूवैज्ञानिक , भू.स. व वि.य. छत्रपती संभाजीनगर, ६. मृद शास्त्रज्ञ , कृषि विज्ञान केंद्र, पैठण रोड छत्रपती संभाजीनगर यांनी मंगल विष्णू बोडखे , मौजे मुधलवाडी विष्णू आसाराम बोडखे मौजे मुधलवाडी भगवान आसाराम बोडखे , मौजे मुधलवाडी, आनंद बबनराव आढाव , मौजे मुधळवाडी ता . पैठण , जि . छत्रपती संभाजीनगर ५. विनोद बबन आढाव, मौजे मुधळवाडी यांउ उपस्थितीत विहरीतील केमिकल युक्त पिवळ्या पाण्याची पाहणी करण्यात आली.

# भिलदरी ते पिशोर रस्त्याची झाली दयनीय अवस्था

आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर :** कन्नड तालुक्यातील भिलदरी येथील नागरिकांना पिशोर येथे येन्या जाण्याकरीता तारे वरची कसरत करावी लागत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे, संबंधित रसत्या साठी येथील नागरिक सतत दोन-तीन वर्षांपासून पाठपुरावा करत आहेत तरी नेतेमंडळी लक्ष देण्यासाठी तयार नाही. भिलदरी ते पिशोर हा मुख्य रस्त्या असुन या रस्त्याचे काम मार्गे लागत नसल्याने सर्वसामान्याला याचा मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. येत्या काही दिसवसात शाळा चालू होतील, मुला मुलींना खूप त्रास सहन करावा लागतो. भिलदरी गावात फक्त आठवीपर्यंत शाळा आहे नंतर शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थ्यांना पिशोरपर्यंत सहा किलोमीटर या रस्त्याने जावे लागते. दवाखाना, पोलिस ठाणे, बँका, सरकारी कार्यलय, आधी सुविधा पिशोर येथे असल्याने वृद्ध, आजारी पेशंट, दिव्यांग व्यक्तींचे खूप हाल होतात. सरपंच ग्रामपंचायत भिलदरी यांनी स्वखर्चातून पूर्ण रस्त्यावर मागच्या वर्षी गड्डे बुजवले होते. यावेळी गावकरी व सगळे ग्रामपंचायत सदस्य व सरपंच उपसरपंच एकजुटीने निर्णय घेणार आहे. यासंदर्भात मंत्री भागवत कराड यांचे पत्रसुद्धा संबंधित ऑफिसला दिलेले आहे. रस्त्याचे काम सुरू न केल्यास नागरिक मतदानावर बहिष्कार टाकणार आहेत, अशी माहिती गावकरी व सरपंच शोभाताई कोठवाळे, उपसरपंच विजय वैष्णव, ग्रा.पं. सदस्य-अश्विनी दिलीप महेर, जयलाल बम्हणावत, गिता सतिश गोठवाळ, सविता चंदन कायटे, नेहरू राजपुत, नारायण कवाळ, संतोष महेर, गोकुळ कायटे, गांधी गोठवाळ, दिलीप राजपुत, भगवान राजपुत, चंपालाल राजपुत, कैलास वैष्णव, जितेंद्र वैष्णव, हनुमान वैष्णव, काकासाहेब चौतमल, ज्ञानेश्वर चौतमल, राहुल बोर्डे, कल्याण पाटील, रमेश पाटील, रमेश गोमलाडू, चरण सुलाने, परसराम कायटे, किरण महेर, राजू महेर, जादू कवाळ, प्रल्हाद सिंगल, मदन सुलाने, बंडू महेर, गजानन गोमलाडू, महादू गोमलाडू, प्रेम कोटवाळे, किरण कोटवाळे, कार्तिक कवाळ, गजाजन महेर, आकाश वैष्णव, चंदन महेर, गोपाल महेर, ईश्वर कवाळ, चंपालाल बम्हणावत, छोटू राजपुत, संतोष पाटे, जादू महेर, प्रेम महेर, चंदन कायटे, गोविंद कायटे, शंकर सिंगल, झनक सिंगल, सचिन राजपुत, संदीप कवाळ, गोविंद सिंगल, माजी सरपंच सुखसागर सिंगल, माजी उपसरपंच बंडू बम्हणावंत,चेअरमन प्रताप कोटवाळे, माजी सरपंच भरत महेर,बाबूलाल मेहर, माजी सरपंच भगवान भाऊ गोठवाळ, जिवन कायटे, मदन राजपुत, जिवन सिंगल, ताराचंद राजपुत, कारभारी सुलाने, कमल सुलाने, रामदास वैष्णव, चंदन वैष्णव,जमिल शहा, रसूल शहा, रमेश भालेराव, उत्तम गायकवाड व समस्त गावकरी यांनी दिली आहे.



**मंत्री डॉ . कराड यांचा शिफारशीला अधीक्षक अभियंता यांनी दाखवली केराची टोपली :** 04 मार्च 2023 केंद्रीय अर्थ मंत्री भागवत कराड, यांनी अधीक्षक अभियंता प्रधान मंत्री ग्राम सड़क योजना यांना या भिलदरी पिशोर रसत्याचे काम सुरु करण्या बाबत लेखी पत्र पाठवून शिफारस केली होती मात्र फॉर्मेलिटी म्हणुन रसत्याचे फक्त मोजमाप करून स्थगित करण्यात आले . येथील ग्रामस्थ या आशेने मंत्री महोदय कड़े गेले होते की कमीत कमी कामची सुरवात येथून होईल मात्र संबंधित विभागाने मंत्री डॉ कराड यांचा शिफाराशिला केराची टोपली दाखवील्याने नागरिक रोषची भावना व्यक्त करीत आहे, एक तर निवेदन देऊन देऊन सर्व ग्रामस्थ थकुन गेले आहे, मात्र या रसत्याच्या कामाला महूर्त मिळेल कधी याची अतुरटेने ग्रामस्था वाट पहात आहे, अनेक नेते मंडळी फक्त मतदान घेण्या करिता येता आश्वासन देऊन पसार होता मात्र या कामा कड़े लक्ष्य दयाला कोणीच तयार नाही या मुळे येथील ग्रामस्थ येत्या विधानसभा निवडनुकी वर भहिष्कार टाकनार असल्याची माहिती मिळत आहे .

# नाशकात सलग दुसऱ्या दिवशी जोरदार पाऊस

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** दोन ते तीन दिवसापासून जिल्ह्यातील ग्रामीण भागात पाऊस हजेरी लावत आहे. त्यामुळे शेतीच्या कामांना वेग आल्याचे पाहायला मिळत आहे. गुरुवारी नाशिक शहरात जोरदार पावसाने हजेरी लावली. त्यानंतर आज सलग दुसऱ्या दिवशी शहराला पावसाने झोडपले. यामुळे शहरातील अनेक रस्त्यांवर पाणी साचल्याचे दिसून आले. नाशिक शहरात आज दुपारी पावसाने हजेरी लावली. त्यामुळे उकाड्यापासून हैराण झालेल्या नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला. तर अचानक आलेल्या पावसामुळे नागरिकांची चांगलीच धावपळ झाली. यावेळी नागरिकांकडे रेनकोट व छत्री नसल्याने त्यांनी लपण्यासाठी ठिकठिकाणी दुकानांच्या गाळ्यांचा आडोसा घेतल्याचे दिसून आले.

शहरातील सकल भागात रस्त्यांवर साचले पाणी शहरातील सिडको, सातपूर, सीबीएस, शालीमार या परिसरासह आदी भागांत पावसाने हजेरी लावली. शहरातील सकल भागात पावसाने रस्त्यांवर पाणी साचल्याची परिस्थिती निर्माण झाली. यामुळे वाहनधारकांना अनेक समस्यांचा सामना करावा लागला. तासाभराच्या पावसाने नाशिकच्या रस्त्यांवर पाणी साचल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

# आवक कमी झाल्याने सोयगावात गुणकारी जांभूळ बाजारपेठेत लवकर दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरात सध्या जांभूळ दाखल झालेली आहेत. उन्हाळ्यातील फळांमध्ये जांभुळ ही एक लोकप्रिय फळ आहे. सध्या जांभूळ या फळाची बाजारात आवक सुरू झाली आहे. मात्र पाऊस बाढेल तसतशी या फळाची आवक जास्त प्रमाणात बाजारात बादत असते. आंबट गोड असा स्वाद असलेल्या आंबा, चिंच, बोरं, जांभूळ अशा रानमेव्याची नावे जरी ऐकली तरी तोंडाला पाणी सुटतं. या प्रत्येक फळांना चवीसह औषधी गुणधर्माने समृद्ध केले आहे. लांबट आणि गोल आकाराची जांभळे ही खरोखरच चवीला आंबट गोड व रसरशीत असतात. उन्हाळ्याच्या शेवटी आणि पावसाळ्याच्या सुरुवातीला जांभूळ बाजारात दाखल होतात. सधा सोयगाव, फत्तेपूर बाजारात जांभळाची आवक घटली आहे. पण यावर्षी रसरसीत जांभूळाच्या किमतीत बाढ झाल्याची पहायला मिळत आहे. वृक्षतोडीमुळे जांभळ वृक्ष दुर्मिळ होत चालले आहे. आयुर्वेदात वृक्षाला मोठे महत्वः १०० वर्षांपेक्षा अधिक जगणारे झाडलाखांदूर बहुऔषधी



गुणयुक्त १०० वषपिक्षा अधिक काळ जगणारा आणि इतरांनाही शतावरी करण्यात उपयुक्त 'जांभुळ वृक्ष' अलिकडे दुर्मिळ होत आहे. वादती वृक्षतोड बाचे प्रमुख कारण आहे. परिणामी, जांभुळ महिना लागताच १०० रूपये किलो प्रमाण ही फळे खरेदी करावी लागतात. जांभळाची फळे नव्हे तर पाने, फुले, साल, खोड आणि चियांचाही औषधी म्हणून उपयोग होतो. आयुर्वेदात या वृक्षाला मोठे महत्त्व आहे. में ब जून महिन्याच्या कालावधीत डोंगराची काळी मैना' म्हणून जांभुळाचे आगमन होते. जांभळात लोहाचे प्रमाण अधिक असते. मधुमेहाच्या आजारात हे फळ महत्त्वाची भूमिका पार पाडत असल्याने त्या रूग्णांसाठी ही फळे बरदानच ठरली आहेत. मधुमेहासोबतब रक्तदाब, कर्करोग, हृदयरोग, अस्थमा या आजारांतही जांभळाचे सेवन उपयुक्त ठरते. दररोज ४ ते ५ जांभळाचे सेवन केल्यास शरीरातील साखरेचे प्रमाण नियंत्रित ठेवणे शक्य होते. रक्तातील हिमोग्लोबीनचे प्रमाण वाढविण्यासह हिरड्यांचे आरोग्य उत्तम राखण्यात जांभळे महत्वाची भूमिका पार पाडतात. जांभळाची महती औषधी गुणधर्मावरच थांबत नाही तर जांभूळ हे उत्तम सौंदं प्रसाधक म्हणूनही काम करते. या फळापासून वाईन, व्हीनेगर, जेली, शरबत आदी तयार करण्यास अलिकडे सुरूवात झाली आहे. यातून नवीन उद्योगाची उभारणी होऊ लागली आहे.अशा उद्योगांकडून थेट जांभुळ खरेदी होत असल्याने त्याचा परिणाम खुल्या जांभळामधील काही गुणधर्मामुळे ब्लड सुगर, ब्लड प्रेशर कंट्रोलमध्ये येतं. त्याशिवाय डोळे देखील चांगले राहतेः- जांभूळ खाण्याचे अनेक आरोग्यदायक फायदे जांभूळ खाण्याचे अनेक आरोग्यदायक फायदे आहेत.बाजारपेठेवर होऊ लागला आहे. यामुळे पूर्वी दिसणारी जांभळ आता बाजारात ठरावीक ठिकाणी दिसतात. या वृक्षाचे लाकूड टिकाऊ व पाणीरोधक असल्याने ते किमान १०० वर्षे टिकते. आता इमारती सिमेंटच्या असल्या तरी पूर्वी जांभुळ वृक्षाच्या राहत होत्या. बहुऔषधी, बहुपयोगी गुणधर्म जांभूळ झाडांसाठी अलिकडे कर्दनकाळ ठाला आहे. मानवाने निसर्गाकडून काही घेण्याच्या मोबदल्यात वृक्ष लागवड केली नाही, बामुळे पर्यावरणाचा समतोल ढासळला आहे. औषधी गुणधर्मच उरला कर्दनकाळजांभूळ या वृक्षाचा औषधी व बहुपयोगी गुणधर्मच त्या वृक्षासाठी कर्दनकाळ ठरत असल्याचे दिसते. लाकूड व औषधासाठी वृक्षांची कटाई होते. पण जांभूळ वृक्षांची लागवड होताना दिलत नाही. बामुळे ग्रामीण भागातूनही हे वृक्ष दिसेनासे होत असल्याचेच चित्र सोयगाव व सावळदबारा परिसरात पाहावयास मिळत आहे.

## संघाची भाजपावर टीका

आधुनिक केसरी

लोकसभा निवडणुकीत भाजपाला २४० जागांवर मर्यादीत राहावे लागले. भाजपा स्वबळावर ३७० आणि एनडीए म्हणून ४०० खासदारांचा टप्पा पार करेल, अशी घोषणा भाजपा नेत्यानी केली होती. मात्र त्यात त्यांना अपयश आहे. भाजपा प्रणीत एनडीएला २९५ जागांवरच समाधान मानावे लागले. निवडणुकीआधी भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाबाबत भाष्य केले होते. ज्यावर त्यावेळी उलटसुलट चर्चाही झाली. आता राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ नेते इंद्रेश कुमार यांचे एक वक्तव्य समोर आले आहे. इंद्रेश कुमार यांनी थेट भाजपाला टोला लगावला आहे. ज्या लोकांमध्ये अहंकार भरला होता, त्यांना प्रभू रामाने २४० च्या संख्येवर मर्यादित ठेवले, असे वक्तव्य इंद्रेश कुमार यांनी केले. राजस्थानमधील जयपूरजवळच्या कनोटा येथे एका कार्यक्रमात बोलत असताना इंद्रेश कुमार यांनी म्हटले, ज्यांनी आजवर प्रभू रामाची भक्ती केली, ते अहंकारी बनत गेले. ज्यांनी स्वतःला सर्वात मोठा पक्ष असल्याचे जाहीर केले, त्यांना प्रभू रामाने २४० जागांवर अडवले. त्यांचा अहंकार यासाठी कारणीभूत ठरला." लोकसभेच्या निकालानंतर सरसंघचालक मोहन भागवत यांनीही सध्याच्या राजकीय परिस्थितीवर चिंता व्यक्त करणारे भाष्य केले होते. त्यानंतर आता इंद्रेश कुमार यांनीही भाजपाला टोला लगावला आहे. इंद्रेश कुमार यांनी फक्त भाजपाच नाही तर काँग्रेसलाही टोला लगावला. भाजपाप्रमाणेच काँग्रेस आणि इंडिया आघाडीचे नाव न घेता ते म्हणाले, ज्यांनी प्रभू रामावर श्रद्धा ठेवली नाही. प्रभू रामाला विरोध केला. त्यांनाही २३४ वर मर्यादित राहावे लागले. देवाचा न्याय असा असतो. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनीही लोकसभेच्या निकालानंतर भाष्य करताना भाजपाला अप्रत्यक्ष खडे बोल सुनावले होते. लोकशाहीत निवडणूक ही अनिवार्य प्रक्रिया आहे. यात दोन पक्ष असल्याने स्पर्धा राहायला हवी. मात्र, हे युद्ध नाही. प्रचारादरम्यान ज्या पद्धतीने टीका झाली त्यातून समाजात द्वेष निर्माण करण्याचा प्रयत्न झाला. आता निवडणुका आटोपल्या असून 'एनडीए'चे सरकार स्थापन झाले आहे. निवडणूक प्रचारात जो अतिरेक झाला त्यापासून दूर होत समस्यांवर चर्चा व्हायला हवी. त्यासाठी सत्ताधारी आणि विरोधकांनी सहमतीच्या राजकारणावर लक्ष द्यायला हवे, अशी अपेक्षा सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी व्यक्त केली होती. मोहन भागवत पुढे म्हणाले, एक खरा सेवक काम करताना शिष्टाचार राखतो. शिष्टाचार राखताना तो अविचल राहतो. 'मी हे केले, ते केले' असा कोणताही श्रेयवाद करत नाही. सेवक कधीच अहंकार दाखवत नाही. तो नेहमी शिष्टाचार पाळतो. फक्त अशा व्यक्तीलाच सेवक म्हणण्याचा अधिकार आहे.



पराग गिल्डा
9420675044

## समकालीन कालखंडातील पाकिस्तान

आधुनिक केसरी

**जागतिक बँकेच्या मध्यस्थीने भारत आणि पाकिस्तान यांच्यात 19 सप्टेंबर 1960 रोजी सिंधू जल करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. या कराराने सिंधू नदीवरील दोन्ही देशांचे हक्क निश्चित केले. सिंधू जल करार भारताकडे अन्यायकारकपणे वागतो, कारण करारानुसार झेलम, सिंधू आणि चिनाब या 3 नद्यांवर भारताला जलविद्युत प्रकल्प उभारायचे आहेत, पाकिस्तान त्यांचे पाणी मुक्तपणे वापरू शकतो परंतु वरच्या बाजूला असलेला भारत धरणे बनवू शकत नाही किंवा कोणतेही जलविद्युत प्रकल्प विकसित करू शकत नाही कारण करारात असे म्हटले आहे की भारत कराराच्या कलमांनुसार वाहणाऱ्या पाण्याच्या नैसर्गिक प्रवाहात अडथळा आणू शकत नाही.**

सिंधू नदी करार आजच्या भू-राजकीय जगात, विशेषतः दक्षिण-आशियाई प्रदेशात अत्यंत प्रासंगिक आहे. याची काही कारणे पुढीलप्रमाणे- हवामान बदल कराराच्या नियमांच्या परिणामांमध्ये आणि काळाच्या ओघात कराराच्या नियमांमध्ये बदल करण्यास भाग पाडण्यात हवामान बदल महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. हवामान बदलामुळे अनिश्चित स्वरूपात वाहणाऱ्या पाण्यासह पाण्याच्या प्रवाहाच्या पद्धतीमध्ये बदल होत आहेत आणि त्याच्या वारंवारतेवर परिणाम झाला आहे, ज्यामुळे या प्रदेशात मुसळधार दुष्काळ आणि पूर येत आहेत ज्यामुळे या प्रदेशातील नदीच्या पाण्याच्या गुणवत्तेवर आणि पाण्याच्या उपलब्धतेवर परिणाम होत आहे. उदाहरणार्थ, जागतिक तापमानवाढीमुळे या प्रदेशातील बदलत्या हवामानामुळे हिमालयातील हिमनद्यांच्या वितळण्यामध्ये तीव्र घट झाली आहे, ज्यामुळे भारत आणि पाकिस्तानच्या दोन्ही बाजूंच्या सिंधू नदीतील पाण्याचा प्रवाह कमी झाला आहे. तसेच, अभूतपूर्व पूर आणि दुष्काळामुळे नदी व्यवस्थेवर आधारित सीमेच्या दोन्ही बाजूंच्या कृषी क्षेत्रावर आणि त्यावर आधारित इतर क्षेत्रांवर परिणाम झाला आहे. धोरणात्मक शस्त्र म्हणून पाणी युद्धाचे युग संपले पाहिजे, परंतु कठीण परिस्थितींपासून देशाचे संरक्षण करण्यासाठी आपल्या शस्त्रागारात विविध प्रकारची शस्त्रे ठेवावी लागतात. या बदलत्या काळात, पाण्याच्या कमतरतेमुळे 'जल' ही संस्कृतमधील पाण्यासाठी धोरणात्मक शस्त्र म्हणून वापरली जाणारी आणखी एक संज्ञा बनली आहे. आता आपण समजून घेऊया की सिंधू जल करारात भारत पाण्याचा शस्त्रांद्वारे वापर कसा करू शकतो. करारात दिलेल्या काही निर्बंधांच्या अधीन राहून भारताला नदीच्या पूर्वेकडील पाणी शेती, औद्योगिक आणि घरगुती कारणांसाठी वापरण्याची परवानगी आहे. दहशतवादाच्या नावाखाली पाकिस्तानला वाहणारे पाणी थांबवणे ही एक सुनियोजित कल्पना आहे. याचा थेट परिणाम पाकिस्तानच्या कृषी क्षेत्रावर आणि अर्थव्यवस्थेवर होईल. हे फार अशक्य आहे कारण यामुळे कराराचे स्वरूप अस्थिर होऊ शकते, ज्याची पाणी विवाद सोडवण्यासाठी अतिशय स्थिर आणि विश्वासार्ह चौकट आहे. सिंधू जल कराराचा (आय. डब्ल्यू. टी.) भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांमधील सिंधू खोऱ्यातील अन्न सुरक्षेवर लक्षणीय परिणाम झाला आहे. सिंधू जल करारामुळे शेतीसाठी विश्वासार्ह आणि अंदाज लावता येण्याजोगा पाणीपुरवठा करून दोन्ही देशांमध्ये अन्न सुरक्षा सुधारण्यास मदत झाली आहे. यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या लागवडीखालील क्षेत्राचा विस्तार करता आला आहे आणि अधिक अन्नधान्य उत्पादन करता आले आहे. अशा प्रकारे, जर सहकार्यासाठी एक छोटीशी खिडकीही उघडली गेली, तर ती फार लवकर येणार नाही, कारण जल राजकारणाचे विद्वान अशोक स्वैन यांच्या म्हणण्यानुसार, "सिंधू जल करार जर कधी झाला तर तो आता त्यात कपात करणार नाही". उदाहरणार्थ, 2050 पर्यंत जगाच्या काही भागात स्वच्छ पाण्याची कमतरता जाणवेल, तर इतरांचा अंदाज आहे की पाणी मिळवण्याच्या वाढत्या संघर्षांमुळे विशेषतः दुष्काळ वाढल्यामुळे आणि इतर आर्थिक ताणांमुळे विषम दृश्ये असलेल्यांना अधिक आकर्षक बनवल्यामुळे अस्थिरता निर्माण होईल. एन. ए. एस. डी. च्या नोंदीत आहे की सिंधूचे मैदान हे जगातील दुसऱ्या क्रमांकाचे अति-तणावग्रस्त जलभृत आहे. दोन कोटी सत्तर लाख लोकसंख्या असलेल्या खोऱ्याची एकूण लोकसंख्या एक आश्चर्यकारक दबाव आणते ज्यामुळे या यादीत आणखी एका अज्ञात क्षेत्राच्या गटासह प्रचंड योगदान मिळते. ऊर्जा सुरक्षा दोन्ही दक्षिण आशियाई शेजारी देशांच्या प्रमुख चिंतांपैकी एक म्हणजे ऊर्जा सुरक्षेची गरज. दोन्ही देश वेगाने आणि अतिवेगाने वाढत असताना त्यांच्या ऊर्जेच्या गरजा देखील त्याच गतीने वाढत आहेत. सिंधू नदी प्रणालीमध्ये जलविद्युत ऊर्जा निर्माण करण्याची मोठी क्षमता आहे.सिंधू जल करार हा ऊर्जा सुरक्षेचा एक महत्त्वाचा पैलू आहे, कारण यामुळे भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांना जलविद्युत निर्मितीसाठी पाण्याचा स्थिर पुरवठा करता येतो. जलविद्युत हा राष्ट्रीय अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा भाग आहे कारण तो स्वच्छ आणि नैसर्गिक ऊर्जा प्रदान करतो ज्यामुळे दोन्ही देशांच्या वाढत्या ऊर्जेच्या मागणीची पूर्तता होईल. याव्यतिरिक्त, सिंधू जल करार जलस्रोतांशी संबंधित संघर्ष



टाळण्यास मदत करतो ज्यामुळे प्रदेशाची स्थिरता कमकुवत होऊ शकते आणि ऊर्जा पुरवठा विस्कळीत होऊ शकतो. सिंधू जल करारानुसार, भारताला पूर्वेकडील नद्यांवर एचईपी विकसित करण्याची परवानगी आहे. ते भारताच्या विजेचे मोठे उत्पादक आहेत. पाण्याचा विचार केला तर सिंधू जल करार पाकिस्तानला जलविद्युत विकास करण्याची परवानगी देतो. पाकिस्तानातही विजेच्या ऊर्जेची सर्वाधिक मागणी पूर्ण करण्यासाठी हे ऊर्जा प्रकल्प आवश्यक आहेत. सिंधू जल करार हे सुनिश्चित करतो की जलस्रोतांच्या बाबतीत कोणताही संघर्ष होणार नाही, ज्यामुळे ऊर्जा पुरवठ्यावर परिणाम होऊ शकतो. उदाहरणार्थ, पाण्याबद्दलच्या युद्धामुळे जलविद्युत प्रकल्प नष्ट होऊ शकतात, प्रत्येक देशाच्या महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधा सिंधू नदी खोऱ्यातील ऊर्जा सुरक्षेतील योगदानामध्ये सिंधू जल कराराचे एकूण महत्त्व आहे. असे असले तरी, त्याच्या ऊर्जा सुरक्षेच्या भूमिकेमध्ये त्याला काही अडचणींचा सामना करावा लागतो. हवामानातील बदलांमुळे हे आव्हान प्रकट होऊ शकते. हवामानातील बदलांमुळे सिंधू नदीच्या खोऱ्यात दुष्काळ आणि तीव्र पूर येण्याच्या घटना वाढतील असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. यामुळे जलविद्युत निर्मितीमध्ये वापरल्या जाणार्या पाण्याचे प्रमाण कमी होऊ शकते. दुसरा अडथळा म्हणजे सिंधू नदीच्या खोऱ्यातील वाढती लोकसंख्या. जसजसे लोक वाढत आहेत तसतशी पाण्याची मागणीही वाढत आहे. यामुळे सिंधू जल कराराच्या पाणी वाटपाच्या व्यवस्थेवर दबाव येऊ शकतो.

**सद्य घडामोडी आणि स्थितीतील बदल :** सध्याच्या करारात बदल करण्याच्या गरजेबाबत भारताने आपल्या समकक्षांना नोटीस पाठवली आहे. पाकिस्तान सरकारने या सूचनेला राजनैतिकदृष्ट्या 'हो' असे उत्तर दिले. दोन्ही देशांना दशकांपूर्वीच्या करारात सुधारणा करून त्याचा पूर्ण वापर करण्याची तातडीची गरज आहे. परंतु मध्यस्थीच्या जागी अडथळे येत असल्याने दोन्ही देश बाह्य मध्यस्थाला मध्यस्थी करण्यास नकार देतात. शिवाय, भारताने अहवाल नाकारल्यानंतर कायमस्वरुपी लवाद न्यायालयाने (पी. सी. ए.) नमूद केले की बेकायदेशीरपणे स्थापन केलेल्या तथाकथित लवाद न्यायालयाने निर्णय दिला आहे की त्यांच्याकडे किशनगंगा आणि रातले जलविद्युत प्रकल्पांशी संबंधित बाबींवर विचार करण्याची 'क्षमता' आहे.
भारताने म्हटले आहे की, करारातील बेकायदेशीर आणि वाईट वागणुकीच्या तरतुदींचा अहवाल स्वीकारण्यासाठी त्याचे पालन केले जात नाही आणि करारानुसार कोणीही केलेल्या कोणत्याही एकतर्फी कारवाईला विरोध करतो. कराराच्या कलम बाराव्या (3) अंतर्गत सिंधू जल करारात सुधारणा करण्याबाबत भारत सरकार पाकिस्तान सरकारशी चर्चा करत आहे. हा अलीकडील विकास केवळ अशा प्रकारचा बदल इतका आवश्यक का आहे हे अधोरेखित करतो. तटस्थ तज्ञांची बैठक 27-28 फेब्रुवारी 2023 रोजी हेग येथे झाली. तटस्थ तज्ज्ञ प्रक्रियेची दुसरी बैठक सप्टेंबर 2023 झाली. सिंधू जल करार भारत आणि पाकिस्तानसाठी का महत्त्वाचा आहे? चांगले संबंध वाढवण्यासाठी सामायिक पाण्यावरून संघर्ष करण्याऐवजी, शेजारील समुदाय त्यात सहभागी होण्याचा निर्णय घेऊ शकतो. हवामानातील बदल, लोकसंख्या वाढ आणि विकास यासारख्या सध्याच्या काळात आपल्याला भेडसावणाऱ्या समस्यांमुळे सिंधू जल करार हा आधुनिक काळात प्रासंगिक आहे. सुरुवातीला, जेव्हा भारतातील सध्याच्या सरकारचा प्रश्न येतो, तेव्हा सिंधू जल करारात सुधारणा करण्याचा त्यांचा मानस असतो. समस्या अशी आहे की भारतासाठी हा करार न्याय्य नव्हता. याचा अर्थ असा आहे की निवडणुका जवळ येत असल्याने दोन्ही देशांना काहीही अबाधित ठेवायचे नाही कारण दोन्ही सत्ताधीशांना त्यांचा स्वतःचा करार आकारात आणायचा आहे. संसाधनांच्या वापराच्या दृष्टीने संपूर्ण सिंधू खोरे खुले केल्याने अखेरीस इतर सामान्य व्यक्तींना फायदा होईल. वर्चस्व असलेल्या अभिजात वर्गाच्या दोन्ही वर्गांना नियंत्रणात राहण्यासाठी हे फायदे पुरवत आहे. सिंधू खोरे उघडणे म्हणजे दोन्ही देशांच्या तरुणांना पर्यटन, जलविद्युत निर्मिती, रस्ते, कालवे इत्यादींच्या क्षेत्रात नवीन संधी उपलब्ध होतील. यामुळे सीमेच्या दोन्ही बाजूंच्या पिण्याच्या पाण्याची समस्या देखील सोडवली जाईल आणि या समस्येचे निराकरण केल्याने शेतकऱ्यांना मोठा फायदा होईल. आता वर कसे जायचे हे दोन्ही देशांवर अवलंबून आहे, एखाद्याने दोन्ही देशांमधील राजकारण आणि अंतर्गत कलह बाजूला ठेवून खालच्या स्तरावरील लोकांबद्दल विचार करणे आणि सिंधू जल विवाद सोडवून त्यांना फायदा करणे आवश्यक आहे. पुढील वाटाघाटीचा मुख्य उद्देश सामान्य माणसाचा फायदा हा असला पाहिजे. आम्ही त्यावर वाटाघाटी कशी करू शकतो? वरील मते वैयक्तिक आहेत.

**(लेखक ओ. पी. जिंदाल ग्लोबल युनिव्हर्सिटीमध्ये इंटरनॅशनल अफेअर्सच्या तिसऱ्या वर्षाचा विद्यार्थी आहे.)**



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

## संघर्षाची पराकाष्ठा दिग्गज घडवते

आधुनिक केसरी

**संघर्षाची पराकाष्ठा यशस्वी झाल्याशिवाय दिग्गज घडतं नाही.थेट दिग्गज म्हणून कोणीही जन्माला येत नाही.अथवा जन्मजात कोणीही दिग्गज नसतो.संघर्षाची पराकाष्ठा हि दिग्गज निर्माण होण्यास अथवा घडण्यासाठी कारणीभूत ठरते. आपल्या मध्ये विविध कालागुण ठासुन भरलेले असतात याच कलागुणांचा विस्तार आणि विकास होताना त्या क्षेत्रातील महान ऋषीतुल्य व्यक्तिमत्व होण्यासाठी पराकोटीचा संघर्ष श्रम करावे लागतात हे वास्तव दुर्लक्षित करून चालणार नाही आपल्या नेतृत्व कौशल्याने, कलागुणांनी अमोघ वाणीने, प्रचंड विनम्रतेने विविध गुण कौशल्याने त्या क्षेत्रातील योग्य अशी उंची गाठणे अथवा बाप माणुस होण म्हणजे दिग्गज ठरणे होय.**

दिग्गजांचा जन्म हा एकाच क्षेत्रांत होत नसुन काला, क्रीडा संस्कृती ,राजकारण समाजकारण, उद्योग, व्यवसाय नोकरी,शेती , अध्यात्म , तंत्रज्ञान,अशा अनेक विविध क्षेत्रांत म्हणजे क्षेत्रा नुसार दिग्गज ठरत असतो.आपल्या मध्ये असणार्या सुप्त कलागुणांना वाव देत यशस्वी व्यक्तिमत्व म्हणून स्वंय विकास होणं म्हणजे स्वाभाविकच त्या क्षेत्रातील दिग्गज व्यक्तिमत्व घडण. कोणीही दिग्गज व्यक्तिमत्व रातोरात किंवा क्षणार्धात निर्माण होत नाही किंवा अचानक प्रकट होत नाही. अथवा चमत्कार होऊन उदयाला येत नाही.त्या साठी अनियंत्रित श्रम घेण्याची तयारी लागते.आज पर्यंत वेगवेगळ्या क्षेत्रात झालेल्या दिग्गज व्यक्तिमत्वापैकी कोणीही थेट दिग्गज म्हणून जन्माला आलं नाही.तर प्रत्येक दिग्गजांला संघर्षाच्या मुशीतूनच जन्म घ्यावा लागतो हे अगदी वास्तव आहे. दिग्गज होण्यासाठी कोणी आभाळातून पडले अथवा विशेष प्रयत्न करून जन्माला आले असे होत नाही.सुरवातीला ते सुद्धा आपल्या सारखेच सर्व साधारण व्यक्ती होते. आणि सर्वसाधारण असतात पण जीवन मार्गावर परस्थिती सोबत खडतर संघर्ष करताना आपल्या आवडत्या क्षेत्रात अहोरात्र प्रयत्न करून स्वतःला झोकून देऊन,संयम ठेवत कठिण अति कठीण परिस्थितीत सुद्धा विचालित न होता स्वतःच्या धेय्या प्रति समर्पित राहताना संयम टिकवून संघर्ष चालू ठेवतात.अगदी संयम तुटण्याची वेळ सुद्धा येऊ शकते पण तरी हि संघर्ष चालूच ठेवला तरच दिग्गज घडायला सुरुवात होते.म्हणून खडतर कठिण संघर्षशिवाय कोणी हि दिग्गज घडत नाही.जे विद्यमान स्थितीतही वेगवेगळ्या क्षेत्रातील काही व्यक्तिमत्व दिग्गज म्हणून परिचित आहेत.त्यापैकी सर्व दिग्गज मान्यवरांची पुर्व पार्श्वभूमी पाहिली अथवा अवलोकन केले अभ्यासल तर आपसुकच असं लक्षात येईल कि कोणीही दिग्गज एका रात्रीत निर्माण झालेला नाही असं इतिहासात कुठेही सापडणार नाही.अनंत संकट अनंत अडचणी अनेक लोकांकडून अवहेलना अनंत वेळ अपमान सहन करून संघर्षाशाची पराकाष्ठा करून अगदी धीर संपुष्टात येण्याच्या वेळेला दिग्गज घडयाल सुरुवात होते.सध्याची विद्यमान पिढी थोडी आळशी आणि प्रत्येक गोष्ट अगदी सहज किंवा सहजा सहजी कशी मिळेल.म्हणजे कोणत्याही प्रकारचे कष्ट,मेहनत न करता किंवा सहज स्वरूपात मिळविण्यासाठी प्रयत्नशिल असताना प्रथम दर्शनी पाह्यला मिळत आहे हे कटु सत्य आहे.परिश्रम मेहनत करण्याची मानसिकता कमी होत चालली आहे.या मध्ये बदल होण अपेक्षित आहे.बदल करण्याची मानसिकता निर्माण झाली पाहिजे पण तशी मानसिकता सध्या तरी दुर्मिळ होत चालली आहे.आणि रातोरात कसं मोठं होता येईल यावरच मंथन चिंतन करतांना बहुतेकांचा कल दिसतो आणि त्याच पद्धतीने प्रयत्न करताना सुद्धा अनेकांना आपण पाहतोय.परंतु या मध्ये मधला मार्ग वापरून यशस्वी होता येत नाही. संघर्ष नको असल्याने नैराश्यचा जन्म होतो. आणि मग त्या मधुन आपलं अपयश कोणाच्या तरी माथी मारून स्वतःला त्या मधून दोष मुक्त करण्याची कवायत चालू होते.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# धर्माबादेत डीएपी खताचा कत्रिम तुटवडा की काळाबाजार ?

## डीएपी व रासायनिक खते तेलंगणा राज्यामध्ये जास्त दराने विक्री

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** शहरातील विविध कृषी सेवा केंद्रावर जास्त दराने बी बियाणे व रासायनिक खते विक्री करण्यात येथे आहे.व डीएपी खाताच तुटवडा होत आहे तसे धर्माबाद तालुक्याला लागून असलेले तेलंगणा राज्यमध्ये बी बियाणे व डीएपी खत जात आहे.तालुका कृषी अधिकारी यांचे लक्ष नाही. केल्या वर्षी कृषी अधिकारी सुरेंद्र पवार यांनी प्रत्यक्षात पाहणी केली व ज्या ज्या ठिकाणी उणिवा आढळून आल्या त्या 7 कृषी सेवाकेंद्र चालकांना कारणे दाखवा नोटीस बजावली होती. पण तात्काळ कृषी अधिकारी यांची कामागिरी हे देवगिरी नेच चालते असे चित्र दिसत आहे.
कृषी दुकानाकरिता विविध प्रकारच्या नियमावली आहेत व त्यांचे पालन करणे अनिवार्य आहे. शहरातील दुकानात रासायनिक खताचा जाणीवपूर्वक तुटवडा निर्माण होऊ नये, बियाणे चढ्या भावाने विक्री होऊ नये तसेच बियाण्याची व खताचा उपलब्ध साठा दर्शनिय भागात लावण्यात यावा, शेतकऱ्यांना पक्की बिले दिली जावेत, गोदामात साठविण्यात आलेला खत व बियाणे साठा नोंदवहीत नोंद करण्यात यावा व ग्राहकांना अतिरिक्त शुल्क आकारणी करण्यात येऊ नये या करिता स्वतः तालुका कृषी आधिकारी विविध दुकानाची, गोदामाची पाहणी केली काय? गेल्या वर्षी धर्माबाद तालुक्यात मोठ्या प्रमाणात सोयाबीन बियाणे उगवण झाले नव्हते परिणामी त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसला होता यंदाच्या वर्षी खबरदारी म्हणून तालुका कृषी विभागाच्या वतीने खरीप हंगामाच्या पेरणी पूर्वीच आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या,नाही तालुक्यातील तिन्ही मंडळा अंतर्गत गावोगावी शेतकऱ्यांना माहिती देत शेतकऱ्यांच्या उपस्थितीत बियाणे उगवण क्षमते बाबतीत प्रयोग करण्यात आले नाही तसेच कृषी दुकानावर नियंत्रण ठेवण्यासाठी फिरते पथक व बैठे पथक स्थापन करण्यात आले आहे तर ते पतक आहे कुठे शेताकऱ्यांना अद्यापही याची माहिती नाही व फक्त शेताकऱ्यांची दिशाभूल करण्याचे प्रकार आहे असे शेताकऱ्यांमध्ये बोलले जातं आहे.

शेतकऱ्यांची खते व बी-बियाणांसाठी उचदराने विक्री व डीएपी खत मिळत नसेलतर व दुकानदारांकडून लूट होत असेल तर त्या शेतकऱ्यांना तक्रारी करण्यात याव्यात, यासाठी धर्माबाद तालुका कृषी विभागातील अधिकाऱ्यांचे नाव व मोवाईल नंबर व टोल फ्री नंबरवर संपर्क साधण्यासाठी आवाहन केले का? मात्र सध्या प्रत्यक्षात अनेक शेताकऱ्यांची सध्या लुट धर्माबाद मधील काही दुकानदारांकडून होत आहे असे शतकऱ्यांमध्ये गुजबुज झालू झाले आहे .गोड-गोड बोलुन दुकानदार शेतकऱ्यांची लुट करत आहेत . तरीही धर्माबाद तालुका कृषी विभाग अजुनही झोपेत असल्याचे दिसत आहेत . धर्माबाद तालुका कृषी विभागाने डमी ग्राहक पाठवून दुकानदारांकडून होणारी लुट चव्हाट्यावर आणावीत धाडसी कारवाई करावी .
**चंद्रकांत पाटील पांगरीकर**
**भाजप मा .उपाध्यक्ष**

धर्माबाद कृषी विभागातील अधिकाऱ्यांनी ऑफीसमधील बसुन टाइमपास करण्याऐवजी आणि केवळ कागदं काळ करण्याऐवजी प्रत्यक्ष फिल्डवर जावं, धर्माबादच्या काही कृषी दुकानदार बी बियाणे, खते तेलंगणा राज्यामध्ये पाठवत आहेत .म्हणून धर्माबादच्या शेतकऱ्यांना डीएपी खताचा तुटवाड आहे असे सांगितले जातं आहे .असे प्रकार कृषी विभागाच्या निर्दर्शनास येईल व स्वत : कृषी अधिकारी दुकानाच्या आजू बाजूस थांबल्यास असे प्रकार त्यांच्यासमोर येतील .चार भिंतीच्या आत बसुन त्यांना काहीच माहिती होणार नाही कृषी अधिकारी यांनी रस्त्यावर उतरून शेताकऱ्यांची पिळवणूक हेणार नाही याच्यासाठी लक्ष द्यावे अन्यथा छावा स्टाईलने आंदोलन करण्यात येईल .
**शिवराज पाटील चोळाखेकर, छावा तालुकाध्यक्ष**




सध्या शेतकरी बि-बियाणे आणि खते खरेदीसाठी गर्दी करू लागला आहे . कपाशीच्या लागवडीसाठी काही ठराविक वाणाच्या बियाणांची मागणी देखील शेतकऱ्यांकडून होऊ लागली आहे .याचा फायदा घेत धर्माबादचे कृषी दुकानदाराकडून शेतकऱ्यांची आर्थिक लूट होऊ लागली आहे .शासनाने ठरखुन दिलेल्या किंमतीपेक्षा दुप्पट पैसे घेवुन एमआरपीप्रमाणे पावती सुद्धा दिले जात नाहीत .तसा प्रकार धर्माबाद तालुक्यामध्ये होत असुन एमआरपी पेक्षाही शेताकऱ्यांकडू जास्त रकम काही दुकानदाराकडून घेतली जात आहे शेताकऱ्यांमध्ये चर्चांना उधाण आले आहे .त्यामुळे धर्माबाद तालुक्यामध्ये भरारी पथकाची स्थापन केवळ आणि केवळ शेताकऱ्यांची दिशाभूल आहे .अशा दुकानदारावर थेट एफआयआर दाखल करून त्यांचे परवाने निलंबीत करावेत .
**पाटील समस्ते, भाजप ओबीसी मा .तालुका उपाध्यक्ष**

# खरीप पीक विमाचे पैसे देण्याची मागणी

## अन्यथा रूपया उधळो आंदोलनचा ईशारा...

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** तालुक्यातील शेतकऱ्यांनी खरीप हंगाम २०२३-२४ मध्ये कपाशी, तूर, सोयाबीन इ. पिकांचा पिकविमा उतरवला होता, पावसाचा मोठा खंड पडल्याने आपला नेवासा तालुका दुष्काळाच्या ट्रिगरमध्ये बसलेला आहे तसेच सप्टेंबर व ऑक्टोबर महिन्यात अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान झाले आहे.
अनेक शेतकऱ्यांनी ऑनलाईन तक्रारी दाखल केल्या आहेत परंतु अद्याप एकाही शेतकऱ्यांला नुकसान भरपाई मिळालेली नाही तसेच सोयाबीन या पिकांचे २५% अग्रीम रक्कम मिळाली आहे परंतु उर्वरित रक्कम अद्याप मिळालेली नाही ही रक्कम मिळाल्यास आगामी हंगामामधे शेतकऱ्यांना पेरणी, बियाणे, खते घेण्यासाठी मदत होणार आहे तरी या गोष्टींचा गांभीर्याने विचार करुन पुढील १५ दिवसांमध्ये शेतकऱ्यांना पिक विम्याची रक्कम देण्यात यावी अन्यथा जीवन ज्योत फाऊंडेशन च्या व तीने आपल्या कार्यालयासमोर तालुक्यातील शेतकऱ्यांसोबत रूपया उधळो आंदोलन करण्यात येईल व काही अनुचित प्रकार घडला, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उपस्थित झाला तर त्याला संबंधित शासकीय यंत्रणा आणि त्या विभागातील अधिकारी सर्वस्वी जबाबदार राहील असे निवेदन कृषी मंत्री धनंजय मुंडे व जिल्हा आधिकारी यांना पाठवण्यात आले. यावेळी जीवन ज्योत फाऊंडेशन चे कमलेश नवले पाटील, छत्रपती युवा सेनेचे नरेंद्र नवथर,अक्षय बोधक,आप्पासाहेब आरगडे, राहुल कांगुणे, अभिजीत बोधक,जैद शेख, विजय खरात, प्रदिप आरगडे,प्रतिक आरगडे, तोफिक शेख आदी शेतकरी सहकारी उपस्थित होते.

# प्रशासकीय यंत्रणा कामाला लावत श्रृतीला मिळवून दिला निराधार योजनेचा लाभ

## तहसीलदार तेजनकर निराश्रीताचा आधार

आधुनिक केसरी न्यूज

**विनोद पाटील बोडखे**

**रिसोड :** आईवडीलांचे छत्र हरविलेली श्रुती ज्ञानेश्वर खाबलकर ही 12 वर्षीय चिमुकली बिबखेड येथील रहिवासी असून ती एक वर्षाची असतानाच कर्करोगाने बालपणीच मातृछत्र हिरावले तसेच गतवर्षी वडिलांचा देखील कर्करोगाने मृत्यू झाल्याने श्रुती चे मातृ पितृ छत्र हरवले तेव्हा पासून तिचा सांभाळ आजी करीत असून आजी श्रुतीला निराधार योजनेचा लाभ मिळण्यासाठी तिची आजी आणि श्रुती तहसील कार्यालयाचे हेलपाटे मारून कंटाळल्या होत्या.
प्रशासकीय कामात लेटलतीफशाही हा काही नविन विषय नाही. त्याचा अनुभव श्रुती आणि तिच्या आजीना आला. त्यातही महसूली कामासाठी भल्या भल्यांना उंबरठे झिजवावे लागत असल्याचे सर्वश्रुत आहे. असाच काहीसा अनुभव बिबखेडा येथील श्रृती खांबलकर या चिमुकलीला आला. ती शासनाच्या निराधार योजनेच्या लाभासाठी प्रयत्न करीत असताना त्यासाठी लागणाऱ्या कागदपत्रांची जुळवाजुळव करण्यासाठी वयोवृध्द आजीसह ती तलाठी, वैद्यकीय अधिकारी, तहसील कार्यालय आदी विभागाचे उंबरठे झिजवू लागली. मात्र,



कागदपत्रांची पुर्तता व अधिकारी, कर्मचाऱ्यांचे वेळकाढू धोरणमुळे श्रुती व तिची आजी वैतागले होत्या. शेवटी दोघींनी तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांची भेट घेण्याचा चंग बांधला आणि कर्तव्य दक्ष तहसीलदार तेजनकर यांची भेट घेतली, तेजनकर यांनी श्रुती आणि आजीचे समस्या जाणून घेऊन निराधार योजनेसाठी पायपिट करुन हताश झालेल्या श्रुतीसाठी दस्तुरखुद्द तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर आधार बनल्या. श्रुतीला निराधार योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा कामाला लावत श्रुतीला निराधार योजनेचा तात्काळ लाभ मिळवून दिला. त्यामुळे चिमुकल्या श्रुतीच्या चेहऱ्यावर हास्य तरळल्याचे दिसून आले. यावेळी कर्तव्य तत्पर, अधिकारी ही ओळख असलेल्या तहसीलदार तेजनकर यांचे आभार मानले.

# बालगृहात व्यक्तिमत्व विकास शिबिर, मार्गदर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** शिक्षण विभाग व पोलीस विभागाद्वारे स्वामी विवेकांनद बालगृह, राजुरा येथे व्यक्तिमत्व विकास शिबिर व स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन करण्यात आले. जिल्हा महिला व बाल विकास कार्यालय, चंद्रपुर अंतर्गत जिल्हयात बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम 2015 नुसार शासकीय व स्वयंसेवी बालगृहामध्ये काळजी व संरक्षणाची गरज असलेली बालके जसे अनाथ, बेवारस, परित्यागीत, हरविलेले, बालकांना बाल कल्याण समिती, चंद्रपूर यांचे आदेशान्वये दाखल करण्यात येते. बालकांना आता उन्हाळी सुट्टया लागल्या असून या वेळामध्ये बालकांना प्रत्येक आठवडयातून दोन ते तिन दिवस व्यक्तिमत्व विकास कार्यक्रम, सुप्त गुणांना चालना देणारे कार्यक्रम, कला कार्यानुभव विषयक मार्गदर्शन मिळाले तर बालकांचे विषयातील अडचणी कमी होऊन त्यांचा आत्मविश्वास वाढेल. तसेच त्यांचा वेळ योग्य कामासाठी उपयोगी पडेल यासाठी शिक्षण विभागाला विनंती करण्यात आली होती. त्यानूसार स्वामी विवेकांनद बालगृह, राजुरा येथे राजुराचे गटशिक्षणाअधिकारी मनोज गौरकर, शिक्षण विस्तार अधिकारी संजय हेडाऊ, विशेष साधन व्यक्ती राकेश रामटेके यांनी प्रवेशित मुलांना व्यक्तिमत्व विकास, अभ्यास कसे करावे या बाबत मार्गदर्शन केले. मनोज गौरकर यांनी मुलांना लागणारे पूर्ण शालेय साहित्य व शिक्षणाकरीता इतर साहित्य लागल्यास गटशिक्षणाधिकारी कार्यालय, राजुरा येथुन मोफत पुरविण्यात येईल व प्रवेशित मुलांना इंग्लीश स्पीकिंग, संगीत, चित्रकला क्लासेस, खेळांचे कोचिंग व अडचणी आलेल्या विषयाचे मोफत कोचिंग देण्यात येईल, असे सांगितले. होमगार्ड तथा शारिरीक शिक्षक मार्गदर्शक नागेश जाधव यांनी मुलांना पोलिस भर्तीसाठी फिजीकल करीता मोफत प्रशिक्षण देणार असे सांगितले. पोलिस उपनिरीक्षक नरेश उरकुडे यांनी पोलिस भर्ती व स्पर्धा परीक्षेबाबत मार्गदर्शन केले. शिक्षण विभागामार्फत असे शिबीर इतर बालगृहात गटशिक्षणाधिकारी कार्यालय मार्फत घेण्यात येणार आहे.

# महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या वतीने किनवट येथे पीक कर्ज नुतनीकरण केलेल्या शेतकऱ्यांचा

आधुनिक केसरी न्यूज

**दशरथ आंबेकर**

**किनवट :** मराठवाड्यात महाग्रामीण नवचेतना संवाद यात्रा चालू असून सामाजिक सुरक्षा, शेतकरी केसीसी नूतनीकरण, बचतगट महिला मेळावा, डिजिटल व वित्तीय साक्षरता मेळावा, वृक्षारोपण यावर महत्व पटवून सांगितले.
इस्लापुर येथे गुरूवारी सायंकाळी महाराष्ट्र ग्रामीण बँकसमोर मंडपात पीक कर्ज नूतनीकरण केलेल्या शेतकरी विनायकराव देशमुख, दिंगाबर जाधव, नंदकुमार गादेवार, सुनिल आडे, गणेश जयस्वाल यांचा सत्कार करण्यात आला महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे छत्रपती संभाजीनगर येथील सहाय्यक सर व्यवस्थापक संगमकर, सर व्यवस्थापक षण्मुख वानखेडे, विभागीय व्यवस्थापक संतोष प्रभावती याच्या हस्ते शाल, हार, गुलदस्त्या देवुन गौरविण्यात आले. तर नारी सक्ती, साईबाबा महीला, वैष्णवी महीला, भिमा माता, प्रगती महीला, लक्ष्मी स्वयसहायत्ता, दुर्गा माता या सर्व महीला बचत गटाच्या अध्यक्ष, सचिव, अरूना कोटुलवार,पार्वता खंदारे, शांताबाई खोकले, मंगल सुदेवाड, वंदना कांबळे, कांताबाई पाचपुते, जयश्री पाचपुते, यशोदाबाई टारपे, सुनीता देशमुखे, लक्ष्मीबाई माझळकर, सुनीता धनवे याचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. विषेशता फक्त २० रूपया मध्ये प्रधानमंत्री सुरक्षा विमा असुन दोन लाख रुपयांचा विमा आहे तर ४३६ रूपयात प्रधानमंत्री जिवन ज्योती विमा योजना असुन यात नैसर्गिक मृत्यू, वीज पडुन, अपघात,मृत्यु झालेल्या पंडीत रामा झाडे, रीठ्ठा तांडा, संजय संभाजी हराळे कोल्हारी, गोपीनाथ भट्टेवाड इस्लापुर, जगदिश पडवळे, सावरगाव तांडा,नंदु जाधव पागरी तांडा, विनाबाई आडे नंदगाव तांडा, नारायन टारफे सांगवी, सरेनकुमार व्यंकटेश झरीवाड चिखली, दिपसिंग मोहन आडे नंदगाव तांडा याच्या वारसदार याना प्रतेकी दोन लाख रूपयाचा विमा पूर्वी देण्यात आला. तसेच उत्कुष्ट केसीसी वसुली



केल्याने शाखा व्यवस्थापक शेख, शिवनी शाखा व्यवस्थापक चव्हाण यांचा विभागीय व्यवस्थापक संतोष प्रभावती यांनी शाल, हार, गुलदस्त्या देवुन सत्कार केला यावेळी मंचावर सहाय्यक सर व्यवस्थापक संगमकर, षण्मुख वानखेडे, नादेड चे क्षत्रिय व्यवस्थापक संतोष प्रभावती, शाखा व्यवस्थापक शेख, दिनेश खालापुरे, रूपेश पांडे, अक्षय थोरात, गणेश जगताप उपस्थित होते.यावेळी सुत्रसंचालन सुनिल आडे यानी केले तर आभार शेख यांनी मानले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाखा व्यवस्थापक शेख, सहाय्यक व्यवस्थापक निखील पोगुलवाड,रोखपाल सुभाष बोईनवाड, मोहन पाथोडे, उत्तम गायकवाड, ग्राहक सेवा केंद्राचे चालक गणेश जयस्वाल, चंद्रकांत जाधव, राजेश आडे, अविनाश कावळे यांनी यशस्वी केले.

# शाळा म्हणजे समाजाची प्रतिकृती..!

आधुनिक केसरी



प्रा.बरसमवाड विठ्ठल
गोकुळवाडी. ता. मुखेड

***आज शाळेचा पहिला दिवस दरवर्षी शाळा 15 जूनला सुरू होतात. त्यामुळे शाळेत जाण्यासाठी मुले उत्सुक असतात. नवे वर्ग, नवे मित्र, मैत्रिणी, नवे पुस्तके, नवा गणवेश, नवीन बॅग, नवे शूज सर्व काही नवे नवे यामुळे मुलांच्या आनंदाला पारावर उरत नाही. प्रदीर्घ सुट्टी उपभोगून मुले आपापल्या विद्यालयात दाखल होतात. काही मित्र-मैत्रिणी आई-वडिलांच्या बदलीच्या निमित्ताने विद्यालय सोडून दुसरीकडे प्रवेश घेतात. त्यामुळे त्यांचा सहवास मिळत नाही. मनाला हुरहुर लागते. काही इतर कारणाने शाळेत विद्यार्थी येऊ शकत नाहीत. त्यामुळे मन उदासीन होते. सर्व सवंगडी एकत्रित येऊन केलेली शाळा वेगळीच असते. शाळेत संस्कार शिकविले जातात ते आयुष्यभर आपणाला बांधून ठेवतात. म्हणून शाळा ही संस्काराची विद्यापीठ असते.***

शाळेत अनेक जाती- धर्माचे मित्र मैत्रिणी मिळतात. त्यांना जात-पात सुद्धा कळत नसते, सर्वजण आपण एक आहोत ही भावना त्यांच्यामध्ये निर्माण होते ही किमया शाळेची असते. शाळा सर्वांना सारखा न्याय देते, म्हणून शाळेला विद्यामंदिर ही म्हणतात. प्रत्येक व्यक्ती शाळेतून शिकून मोठा होतो, अनेक वर्षे तो शाळेत गेलेला असतो, त्याला आज जरी मोठी नोकरी लागली तरी तो शाळा विसरत नाही. गावापासून दूर नोकरीसाठी गेलेली व्यक्ती गावाची आठवण काढताना शाळेची विचारपूस हमखास करतात.शाळेने अनेकांना मोठे केले.भेदभाव काढून टाकले. अंगत पंगत करून जेवण दिले. खेळताना धमाल केली. वर्गातील शिस्तीमुळे अनेकांना आयुष्याची शिस्त लागली .संस्काराचे धडे मिळाले. छडी लागल्यामुळे विद्येचे महत्त्व कळाले. छडीमुळे आम्ही आज स्वतःच्या पायावर उभे राहिलो,शिक्षा झाली. म्हणून आम्ही आज अधिकारी आहोत. गुरुजींनी शिक्षा केली नसती तर आम्ही आज रिकामटेकडे राहिलो असतो, असे अनेक जण प्रांजळपणे चार- चौघात सांगतात. हे सांगताना त्यांना थोडाही कमीपणा वाटत नाही, म्हणून गुरुजींनी शिस्त लावून शिक्षा केली हे त्याकाळी फार चांगले झाले.गुरुजींनी शिक्षा केले म्हणून घरातील लोकांना ही सांगता येत नसत, सांगितले तर घरी सुद्धा मार खाण्याची वेळ येत असे, म्हणून अभ्यास केल्याशिवाय पर्याय नव्हता, पाढे, पाठांतर करावे लागत होते. शब्दार्थ, सूत्र ,पाठांतर करून वर्गात बसावे लागत होते, नाहीतर वेताची छडी असायची. टेबलावर हात ठेवून गुपचूप उभे राहावे लागत असे. शाळेचा पहिला दिवस आजही मला आठवतो, काही मुले रडत रडत येतात, पण शाळा शिकतात. ते दिवस कोणीही विसरू शकत नाहीत. प्रत्येक आईला आपला मुलगा शिक्षण शिकावा, मोठा व्हावा असे वाटत असते, म्हणून ती मुलांना शाळेत आणून सोडते, जे शाळेत मार खाऊन शिकले ते समाजाच्या प्रवाहात उतरले. जे शिकले नाहीत त्यांना शाळेची आठवण पुन्हा पुन्हा येते. केलेल्या चुका हमखास आठवतात इतरांकडे पाहून शाळेचे स्मरण होते. गेले ते दिवस, राहिल्या त्या आठवणी असे म्हणावे लागते. ज्येष्ठ समाज सुधारक अण्णा हजारे म्हणतात " मी घरी गृहपाठ केलो नव्हतो आणि शाळेत खोटे बोललो, वही घरी राहिली, असे गुरुजींना सांगितले. गुरुजी म्हणाले "जा ? घरी जाऊन गृहपाठाची वही घेऊन परत शाळेत ये," तेव्हा मी घरी गेलो,आईला खरे सांगितले.तेव्हा आई सुद्धा माझ्या सोबत शाळेत आली. त्यानंतर माझी कशीबशी सुटका झाली असे दिलखुलासपणे ते त्यांच्या आत्मचरित्रात लिहितात.



शाळेने संस्कार व नीतिमत्ता शिकविले. म्हणून शाळेचा पहिला दिवस मानवाच्या जीवनातील अविस्मरणीय क्षण असतो, तो मानवाला धर्म, तत्वे, नीती, न्याय ,संस्कार सर्व काही शिकवते, शाळा पत्र्याची असो की, दगडांची असो त्या शाळेत शिकवणारे शिक्षक मुलांना संस्कार देतात. प्रत्येक शाळेत योग्य ज्ञान मिळते ते ज्ञान आपण कसे आत्मसात करतो, यावर बरेच काही अवलंबून आहे. शाळेला कोणीही दोष देऊ नये. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे हे शाळेत फक्त दोनच दिवस गेले आणि एवढे प्रचंड लोकसाहित्य लिहून काढले हे मुद्दाम येथे नमूद करावे वाटते. कारण शाळेनी त्यांना घडविले. त्यामुळे शाळा हे एक ज्ञानरूपी सरिता आहे. 7 नोव्हेंबर रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे शाळेत गेले. तो त्यांचा पहिला दिवस होता, तो दिवस आज भारतभर विद्यार्थी दिवस म्हणून साजरा केला जात आहे. म्हणून शाळेला ज्ञानाचे भांडार म्हणतात. तसेच शाळेला विद्यार्थ्यांचे दुसरे घर ही म्हणतात. शाळेत मित्र, मैत्रिणी, शिक्षक असतात. शाळा म्हणजे समाजाची प्रतिकृती होय. शाळेत मुलांचा भावनिक, बौद्धिक, मानसिक विकास होतो. कोमल बाल मनावर अनेक संस्कार विद्यालयात केले जातात. प्रत्येक मुलाची आवड वेगळी असते, त्यामुळे ते शिकतात गुरुवर्य रवींद्रनाथ टागोरांनी सर्व बालके एकत्रित करून शांतिनिकेतन ही शाळा सुरू केली म्हणून शाळेला एक संस्कार सरिता आपण म्हणूया! काळानुसार शिक्षण बदलत आहे म्हणून शाळेचा पहिला दिवस आज अतिशय आनंदाने घालूया! शाळेच्या पहिल्या दिवसाला खूप खूप शुभेच्छा.


# एक अकेला कितनों पर भारी

आधुनिक केसरी



अशोक राणे, अकोला
संपर्क क्र. 9423658385

***हिंदुस्तानमधील सोळाव्या लोकसभा निवडणुकीचे निकाल लागेल असून तिसऱ्यांदा शक्तीपुत्र नरेंद्र मोदी यांनी भारतमातेला जगाच्या सर्वोच्च शिखरावर स्थापित करण्यासाठी दिल्लीच्या तख्तावर पंतप्रधान पदाची शपथ घेतली आहे तसे पाहिले तर वर्ष २०२४ ची लोकसभा निवडणुक भाजपा साठी पाहिजे तेवढी सोपी नव्हती कारण देशातील सर्वच राजकीय पक्ष एकत्र येऊन त्यांनी इंडी आघाडी करून भाजपा समोर मोठे आव्हान उभे केले होते तसेच अल्पसंख्याक समाजात भीतीचे वातावरण निर्माण करून संविधान बदल आरक्षण समाप्त हा नौरेटिव मोठ्या प्रमाणात चालवून संभ्रम निर्माण करण्यात आला एस.टी स्टँड,रेल्वे स्टेशन, पानटपऱ्या, हॉटेल गांवातील पारावर तथा सार्वजनिक ठिकाणी संविधान बदल, आरक्षण समाप्त अशा चर्चा घडवून आणल्या त्यासाठी काही लेखक, पत्रकार यांनी इंडी आघाडीला पूरक अजेंडे राबविले तसेच संविधान आणि राष्ट्रीय एकात्मतेवर विश्वास न ठेवणाऱ्या स्टॅलिनपासून सैम पित्रोदा सारख्या अनेकांनी वायफळ बडबड करून आपली बौध्दीक दिवाळखोरी प्रगट केली होती.*** मणिशंकर अय्यर पासून फारुक अब्दुल्ला यांनी सुद्धा पाकीस्तान जवळ अणुबॉम्ब आहे असे भाष्य करून मुस्लिम



मतदारांना काँग्रेस कडे आकृष्ट करण्याचा प्रयत्न केला होता इंडी आघाडी मधील अनेक नेते हिंदूत्व अर्थात सनानात संस्कृती संपविण्याची भाषा करीत होते उघड उघड देशात अराजकता निर्माण करण्याची भाषा सुध्दा करीत होते ह्या सर्व चर्चा, वक्तव्ये आंतरराष्ट्रीय मीडिया मध्ये चर्चेचा विषय ठरून लोकसभा निवडणुकी कडे सर्व जगाचे लक्ष लागले होते व विदेशी अदृष्य शक्ती सुध्दा मोठ्या प्रमाणात कार्यरत झाल्या होत्या भाजपा कार्यकर्ता विशेषतः ग्रामीण क्षेत्रात विरोधांकांचे नौरेटीव खोडून काढून समाजात आत्मविश्वास निर्माण करण्यात अयशस्वी ठरलेला आहे त्यांनी घेतलेल्या कष्टावर शंका घेण्याचे कारण नाही पण वर्ष २०१४ च्या लोकसभा निवडणुकी प्रमाणे मेहनत घेतली गेली नाही त्यामुळे भाजपाच्या जागा कमी झाल्या आहेत तरी सुध्दा विरोधकांचे मनसुबे उधळून नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा सत्तेत परतले आहेत सोबतच केरळ ते आंध्र प्रदेशात विजयी प्रवेश करून आपले निर्विवाद वर्चस्व सुद्धा प्रस्थापित केले आहे.

नरेंद्र मोदी यांनी कार्यकर्त्या मध्ये उत्साह निर्माण करण्यासाठी अब की बार ४०० पार ची घोषणा देऊन नरेंद्र मोदी एखाद्या कसलेल्या सेनापती प्रमाणे निवडणुकीच्या आखाड्यात उतरले होते तसेच आपल्या सहकाऱ्यांना विश्वासात घेऊन आणि मित्र पक्षांना सोबत घेऊन त्यांनी निवडणुकीच्या विजयाची रणनीती आखली होती लोकसभेच्या एका एका जागेवर त्यांच बारीक लक्ष होत "जहाँ कम व्हावा हम" या युक्तीने त्यांनी प्रचंड मेहनत घेऊन संपूर्ण देश पिंजून काढला धडाकेबाज लाखोंच्या २०६ जाहीर सभा व जोखीमचे भरगच्च रोड शो करून सामान्य माणसा सोबत संवाद साधला आहे त्यामुळे देशातील जनता जनार्दनानी नरेंद्र मोदी यांच्यावर भरभरून प्रेम करीत आपल्या अमूल्य मतांचे दान झोळीत टाकले व हिंदुत्वाचा विजयी अश्व हिंदुस्तानच्या भाग्योदय साठी दिल्लीच्या तख्तावर नेला आहे भविष्यात हाच हिंदुत्वाचा विजयी अश्व जगात अश्वमेध होऊन भारतमातेला जगाच्या सर्वोच्च वैभवस्थानी घेऊन जाईल भारतमातेची भक्ती करीत "हिंदूत्व अश्व विजयी जग जिंकण्या निघाला"या गीताच्या ओळी म्हणत गेल्या शंभर वर्षांत लाखो ध्येयवेड्या कार्यकर्त्यांनी हाच विजयी दिवस पाहण्यासाठी काम केलेल आहे प्रचंड कष्ट केलेले आहेत अनेक पिढ्या हाच दिवस पाहण्यासाठी खपल्या आहेत लोकसभा २०२४ निवडूनुकीच्या पूर्वी देशातील राजकीय घडामोडीचा मागोवा घेतल्यास नरेंद्र मोदी एकीकडे आणि देशातील सर्व राजकीय पक्ष एकीकडे अशी परिस्थिती निर्माण झाली होती तेव्हा विरोधी पक्षाच्या नेत्यांना उद्देशून त्यांनी संसदेच्या मागील हिवाळी अधिवेशनमध्ये संसदेच्या सभागृहातच "देश देख रहा है, एक अकेला कीतनो पर भारी पड रहा है,देश के लिए जीता हू देश के लिए कूछ करने निकला हुं "अशी सिंहगर्जना केली होती देशात झालेल्या लोकसभा निवडणूकीतत्यांनी प्रचंड विजय संपादन करून आपल्या लोकसभेत केलेल्या"एक अकेला कीतनो पर भारी पड रहा है " सिंहगर्जनेच्या घोषणेवर शिककामोर्तब केले आहे मायबाप जनते सुद्धा त्यांना एकटे पडू दिले नाही देश त्यांच्या बाजूने त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा

राहिला मोठा विजय संपादन करतांना जागा कमी झाल्या आहेत परंतू त्यांनी आपला राजकीय करिश्मा आजही कायम असल्याचे सिध्द केले आहे शेवटी एकी कडे नरेंद्र मोदी आणि दुसरी कडे देशातील सर्व राजकीय विरोधी पक्ष एकत्र आले असताना "एक अकेला कितनो पर भारी पड रहा है" हे सिद्ध करून दाखविले आहे.

# भय, भूक आणि भ्रष्टाचार मुक्त भारत व्हावा

आधुनिक केसरी



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

***अपेक्षेप्रमाणे सलग तिसऱ्यांदा नरेंद्र मोदी भारताच्या पंतप्रधानपदी विराजमान झाले. ९ जूनच्या सायंकाळी राष्ट्रपती भवनाच्या प्रांगणात नव्या सरकारचा दिमाखदार शपथविधी सोहळा पार पडला. सलग तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेणारे मोदी हे पंडित नेहरू यांच्या नंतरचे दुसरेच पंतप्रधान आहेत. मोदींना स्वबळावर बहुमत मिळाले नसले तरी मित्र पक्षांच्या मदतीने त्यांनी सरकार स्थापन केले आहे. मोदी यांना सलग तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यात तरुणांचा मोठा वाटा आहे.*** मागील दोन निवडणुकीप्रमाणेच या निवडणुकीतही तरुणांनी एनडीएला भरभरून मतदान केले. आता या नव्या एनडीए सरकारने तरुणांसाठी मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती करावी. कारण गेल्या काही वर्षात देशातील बेरोजगारी मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. मागील काही वर्षात बेरोजगारीचा दर कमालीचा वाढला आहे. शिक्षण व गुणवत्ता असूनही तरुणांच्या हाती काम नाही अशी अवस्था झाली आहे. तरुणांच्या हाती पदवी आहे मात्र नोकरी नाही त्यामुळे तरुणांमध्ये कमालीचे नैराश्य पसरले आहे. ज्या तरुणांच्या जोरावर आपण महासत्ता बनण्याचे स्वप्न पाहत आहोत तोच तरुण वर्ग रोजगार नसल्याने नैराश्याच्या गर्तेत अडकला तर ती देशासाठी धोक्याची घंटा असेल. या तरुणांना नैराश्याच्या गर्तेतून बाहेर काढण्यासाठी एनडीए सरकारने धोरणात्मक निर्णय घ्यायला हवेत. नवीन रोजगार निर्माण करण्यासाठी एनडीए सरकारने लवकरात लवकर उपाययोजना करायला हव्यात. संयुक्त राष्ट्राच्या अहवालानुसार जगातील सर्वाधिक तरुण भारतात राहत आहे. देशातील ६० टक्के लोकसंख्या ही १८ ते ४० वयोगटातील आहे म्हणूनच भारताला तरुणांचा देश असे म्हंटले जाते. या तरुणांमध्ये प्रंचड गुणवत्ता असून काम करण्याची ऊर्मी आहे. या तरुण वर्गाला जर रोजगार मिळाला तर त्यांच्या गुणवत्तेचा आणि मेहनतीचा उपयोग राष्ट्र उभारणीच्या कार्यात नक्कीच होईल. तरुणांप्रमाणेच शेतकऱ्यांचे प्रश्न देखील मोठ्या प्रमाणात आहेत. दुष्काळाने बळीराजा होरपळून निघाला आहे. पाऊस नाही त्यामुळे पीक नाही जे पीक आहे त्याला भाव नाही अशी अवस्था देशातील बळीराजाची झाली आहे. त्यामुळे शेतकरी आत्महत्येचे सत्र अजूनही सुरू आहे. एनडीए सरकारने पिकांना हमीभाव देऊन स्वामिनाथन आयोगाची प्रभावी अंमलबजावणी करावी. दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना अनुदान देऊन त्यांना दिलासा द्यावा. मोदी सरकारच्या मागील पाच वर्षाच्या काळात शेतकऱ्यांना अनेकदा मोर्चा काढावा लागला. महाराष्ट्रासह काही राज्यातील शेतकऱ्यांवर संपावर जाण्याची वेळ आली तशी वेळ पुन्हा येता कामा नये याची दक्षता सरकारने घ्यायला हवी. देशातील महागाई वाढत चालली आहे. महागाईने सर्वसामान्यांची कंबर मोडली आहे. वाढत्या महागाईने मध्यमवर्ग चिंताग्रस्त झाला आहे. घरगुती गॅस सिलेंडर आणि इंधनाचे दर सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर गेले आहेत. दिवसेंदिवस महागाई गगनाला भिडत आहे. गगनाला भिडणारी ही महागाई रोखण्याचे काम एनडीए सरकारने करावे. देशातील नागरिकांचा सर्वात जास्त खर्च आरोग्य आणि शिक्षणावर होत आहे. या सरकारने नागरिकांचा शिक्षण आणि आरोग्यावरील खर्च कमी करावा. २००५ नंतर सरकारी सेवेत दाखल झालेल्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी. मोदी सरकारच्या पहिल्या पाच वर्षाच्या काळात भ्रष्टाचाराला आळा बसला होता मात्र मागील पाच वर्षात देशात पुन्हा भ्रष्टाचार वाढला आहे त्यामुळे आता पुन्हा एकदा भ्रष्टाचारावर सर्जीकल स्ट्राईक करण्याची वेळ आली आहे. नव्या सरकारने तो करावा अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत. मागील पाच वर्षात सरकारी यंत्रणांचा मोठा दुरुपयोग करण्यात आला आता तरी सरकारने सरकारी यंत्रणांचा दुरुपयोग थांबवावा.

# चंद्रपुरात पुन्हा कृत्रिम पुराचा धोका; नाल्या तुडुंब भरल्या

## सफाई कामगारांची संख्या अर्ध्यावर : जनविकास सेनेचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** मागील वर्षी चंद्रपूर शहरात पहिल्याच पावसामुळे पूर परिस्थिती उद्‌भवली होती. वडगाव प्रभागातील नानाजी नगर, दत्तनगर, मित्र नगर, बापट नगर,स्नेह नगर, भावनाथ सोसायटी, अपेक्षा नगर, ओम भवन इत्यादी परिसरात नागरिकांच्या घरात पाणी शिरले होते. हजारो नागरिकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले. संपुर्ण शहरात कमी जास्त प्रमाणात हीच परिस्थिती पहिल्या पावसाने निर्माण केली होती. मुळात पावसाळ्यापूर्वी सर्व नाल्यांची सफाई करणे, नाल्यांमध्ये साचलेला कचरा काढून नाल्यांचे प्रवाह मोकळे करणे अशी स्वच्छतेची महत्त्वपूर्ण कामे मागील वर्षी मनपाने केले नाही. मनपाच्या या चुकीमुळे कृत्रिम पुराचा फटका शहरातील नागरिकांना बसला, हजारो नागरिकांचे आर्थिक नुकसान झाले असा आरोप मनपाचे माजी नगरसेवक पप्पू देशमुख यांनी केला.

यावर्षी सुद्धा संपूर्ण शहरातील नाल्यांमध्ये कचरा साचलेला आहे, नाल्या तुडुंब भरलेल्या आहेत.त्यामुळे पहिल्याच पावसात पुर सदृश्य परिस्थिती निर्माण होण्याचा धोका असल्याचा इशाराही त्यांनी दिली.या बाबत तातडीने उचित कार्यवाही करण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष जिल्हाधिकारी विनय गौडा यांना पप्पू देशमुख यांच्या नेतृत्वात जनविकास सेनेच्या शिष्टमंडळाने लेखी पत्र देऊन उचित कार्यवाही करण्याची मागणी केली.

शिष्टमंडळामध्ये जनविकास सेनेचे सुभाष पाचभाई,मनिषा बोबडे,अक्षय येरगुडे,अमोल घोडमारे,स्नेहल चौथाडे इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते. निवासी उपजिल्हाधिकारी संजय पवार यांच्यामार्फत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.



### बल्लारपूरचा वादग्रस्त कंत्राटदाराची नियुक्ती

मनपा आयुक्त बिपिन पालीवाल बल्लारपूर नगर पालिकेत मुख्याधिकारी असताना दीपक उत्तराधी या कंत्राटदाराकडे कचरा संकलनाचे काम होते . याच कंत्राटदाराला मागच्या वर्षी मनपाच्या नाली सफाईचे काम मिळाले . तीन वर्षांपूर्वी मनपा मध्ये 300 च्या जवळपास कंत्राटी कामगार नाली सफाईचे काम करत होते . दिपक उत्तराधी यांनी ही संख्या 180 च्या जवळपास आणली . संपूर्ण शहरात एकूण 90 हजारच्या वर निवासी व व्यावसायिक मालमत्ता आहेत . यातील सांडपाणी तसेच पावसाचे पाणी वाहून नेणाऱ्या नाल्यांची एकूण लांबी 1000 किलोमीटरच्या जवळपास आहे . स्वच्छतेच्या निकषानुसार सात दिवसातून एकदा प्रत्येक नालीची सफाई करणे आवश्यक आहे .नाली सफाईच्या कामाकरिता जवळपास 500 ते 600 कामगारांची गरज आहे .मात्र नविन कंत्राटदाराने केवळ 180 कामगारांची नियुक्ती केली . एवढ्या कामगारांमध्ये शहराची सफाई अशक्य असल्याने कामाचा ताण वाढला .स्वच्छता विभागाचे निरीक्षक, सफाई दरोगा, अधिकारी सर्वच हतबल झालेले आहेत . नवीन कंत्राटदारासोबत झालेल्या करारानुसार पंधरा दिवसातून प्रत्येक नालीची सफाई करून जिपिएस फोटो अपलोड करणे गरजेचे आहे .अन्यथा दंड आकारण्याची तरतूद करारात आहे .शहरात चार-चार, सहा-सहा महिने नाली सफाई होत नसल्याने नागरिक त्रस्त आहेत . मात्र आजपर्यंत कंत्राटदाराला दंड आकारलेला नाही . कामगार कमी केल्याने कंत्राटदार व आयुक्तांची मजा असून नागरिकांना सजा मिळत असल्याची टिप्पणी देशमुख यांनी केली .



# महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांची खासदारपदी वर्णी

## निरेत कार्यकर्त्यांकडून फटाके फोडून आनंद साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** बारामती लोकसभा मतदारसंघातुन महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांचा पराभव झाला होता.या पराभवाने कार्यकर्त्यांमध्ये नाराजी होती.सुनेत्रा पवार यांना राज्यसभेवर खासदार म्हणून पाठविण्यात आल्याने अखेर कार्यकर्त्यांनी ही नाराजीची मरगळ झटकली असून या निवडी बद्दल आनंद साजरा केला जाऊ लागला आहे.

पुरंदर तालुक्यातील निरा येथे महायुतीच्या कार्यकर्त्यांनी फटाके वाजवीत, पेढे भरवित जल्लोष व्यक्त केला आहे. यावेळी महायुतीचा विजय असो, अजितदादा तुम आगे बढो,हम तुम्हारे साथ है, सुनेत्रा वहिनी तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ है, एकच वादा अजित दादा, नरेंद्रभाई मोदींचा विजय असो अशा घोषणा देत जयघोष करण्यात आला. राष्ट्रवादी जिल्हा नियोजन समितीचे सदस्य विराज काकडे,महाराष्ट्र राज्य प्रदेश सदस्य अजित सोनवणे, पुरंदर तालुका अध्यक्ष अल्पसंख्यांक नदीम सय्यद, शहराध्यक्ष प्रमोद काकडे, ग्रामपंचायत सदस्य अनिल चव्हाण, शहराध्यक्ष ओंकार लकडे, भाजप शहराध्यक्ष सुरेंद्र जेधे, भाजपचे योगेंद्र माने, शिवसेनेचे रणजीत निगडे, निखिल चव्हाण, निखिल बनसोडे, सुरज शिंदे, प्रकाश कदम, रोहन थोपटे, महेश राव आदींनी आनंद व्यक्त केला. विराज काकडे म्हणाले की,राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते आदरणीय अजितदादा पवार यांच्या सुविद्य पत्नी आणि आमच्या नेत्या आदरणीय सुनेत्रावहिनी यांची राज्यसभेवर बिनविरोध निवड झाली. याचा आनंद आम्हा सर्व तरुणांना व कार्यकर्त्यांना आहे.मागच्या काही दिवसांपूर्वी लोकसभेच्या निवडणुकीत सुनेत्रावहिनी यांचा प्रचार तन मन धनाने करीत होतो. परंतु विकासाच्या बरोबर भावनिकतेची लाट, असं वारं फिरलं, बरीचशी कारणं निवडणुकीत आली.परंतू आम्हा सर्वांना असं वाटत होतं.सुनेत्रा वहिनी ज्या दिवशी निवडून येतील. त्या दिवशी बारामती लोकसभा मतदारसंघाचा निश्चित विकास घडेल आणि हा विकास भविष्याच्या पिढी साठी अतिशय योगदायी ठरेल. त्यामुळे सुनेत्रावहिनींनी खासदार होणं हे खरंतर त्यांनी लोकसभेच्या जागेवर पाहिजे होतं.परंतु ती खंत महायुतीच्या माध्यमातून पूर्ण झाली. महायुतीचे मनापासून आभार मानतो.सुनेत्रा वहिनीना जशी खासदारकी ची संधी दिली.अशीच संधी मोदी साहेबांनी त्यांना मंत्रिमंडळात द्यावी. अशी अपेक्षा सुद्धा विराज काकडे यांनी व्यक्त केली.

अजित सोनवणे म्हणाले की,बारामती लोकसभेमध्ये आम्ही सर्व युवकांनी अहोरात्र काम केलं.आम्हांला अपयश आलं.पण महायुतीने जी आमच्या उमेदवाराला संधी दिली त्या संधीचं शंभर टक्के आमचा उमेदवार हा सोनं करेल असे आश्वासन देतो.योगेंद्र माने म्हणाले की,नुकत्याच झालेल्या बारामती लोकसभा सार्वत्रिक निवडणुकी मध्ये काही कारणांमुळे काही गोष्टींमुळे व काही लोकांनी बुद्धीभेद केल्याने सुनेत्रा वहिनी यांचा पराभव झाला होता.

ही खंत सगळ्या कार्यकर्त्यांमध्ये होती.परंतु आज आदरणीय सुनेत्रावहिनी अजितदादा पवार यांना महायुतीच्या वतीने राज्यसभेवर घेऊन बारामती लोकसभा विकासासाठी अतिशय योग्य निर्णय झालेला आहे.वेगाने विकास होण्यासाठी मदत होणार आहे.नदीम सय्यद म्हणाले की,आज खूप आनंदाची बातमी झालेली आहे. सुनेत्रा

वहिनींसाठी युवकांनी जे मतदानासाठी कष्ट घेतलं होतं.त्याचं आज खरच महायुतीच्या माध्यमातून सार्थक झालेलं आहे. समाजासाठी, अल्पसंख्याक विभागासाठी निधी आणण्यासाठी आम्ही प्रयत्न जरूर करू. सुरेंद्र जेधे म्हणाले की,नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने राज्यामध्ये ज्या घडामोडी झाल्या.भारतीय जनता पार्टीची जरी पीछेहाट झाली असली तरी नक्कीच आम्हाला नरेंद्रभाई मोदी या देशाचे तिसऱ्यांदा पंतप्रधान झाल्याने आम्हां महायुतीला आनंद आहे. सुनेत्रावहिनीना राज्य सभेवर खासदार म्हणून घेतलेलं आहे. त्यांना तिथं पर्यंत न थांबविता त्यांना मंत्रीमंडळात समाविष्ट करून घ्यावं अशी विनंती मोदी साहेबांना करतो.

# महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची निवड झाल्याबद्दल फळवाटप

आधुनिक केसरी न्यूज

**बल्लारपूर :** सरकारी रुग्णालय इथे मंदिपभाऊ रोडे जिल्हाध्यक्ष चंद्रपूर यांचा मार्गदर्शना खाली फळ वाटप करण्यात आले. जिल्हाउपाध्यक्ष विष्णूभाऊ बुजोने. तालुकाअध्यक्ष गोपालभाऊ मोहुर्ले. उमेशभाऊ श्रा कुंडले शहरअध्यक्ष बल्लारपूर मनसे यांचा नेतृवाखाली सरकारी रुग्णालय ३१ रुग्णाना फळ वाटप करण्यात आले. उपस्थिती अरुणाताई तोडसाम शहरअध्यक्ष महिला आघाडी प्रवीण बावणे प्रशांत बानकर विजेंद्र परमार योगराज चौधरी कुणाल सहारे मोहन राजभर हेमंत डंबारे मनोज तोडसाम किरणताई मडावी ज्योती पिंपळकर चंदा पंधराम उपस्थिती सर्वे मनसे पदाधिकारी अशस्वी रितीने कार्यक्रम संपन्न झाला.



# कुत्र्यांच्या हल्ल्यात जखमी हरणाचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव राजा :** कुत्र्यांच्या हल्ल्यात जखमी झालेल्या हरणाच्या पिलाचा अखेर मृत्यू झाल्याची घटना निमखेड शिवारात घडली. नागरिकांनी कुत्र्यांच्या तावडीतून सदर हरणाच्या पिल्लास सोडविले होते.

वनातून भरकटलेला हरणाचा पिल्लू निमखेड गावा नजीक आले असता दोन-तीन कुत्र्यांनी तिचा पाठलाग करून हल्ला केला त्यावेळी शिवाजी कव्हळे, किसन कव्हळे व रामेश्वर कव्हळे यांनी सदर हरणाच्या पिल्लास कुत्र्यांच्या तावडीतून सोडविले, भेदरलेल्या रक्तबंभाळ हरणाला पाणी पाजले,तेथील पत्रकार चंद्रभान झिने यांनी वनपरिक्षेत्र अधिकारी श्री गायकवाड यांनाघटनेची माहिती दिली. त्यांच्या आदेशानुसार लगेच वनपाल दिपाली खांडेभराड निमखेड येथे पोहोचल्या मात्र सदर हरणाने प्राण सोडले होते. मृतक हरणाला वन कर्मचाऱ्यांनी ताब्यात



घेतले नंतर त्याचे पोस्टमार्टम करून दफन विधी करण्यात आला. कुत्र्यांच्या तावडीत सापडलेल्या हरणाला सतर्क नागरिकांनी वाचविण्याचे प्रयत्न केले मात्र दुर्दैवाने सदर हरणाचा मृत्यू झाला.

# दरड कोसळल्याने वाहतूक विस्कळीत

आधुनिक केसरी न्यूज

**कोल्हापूर :** अनुस्कुरा घाटामध्ये दरड कोसळली आहे. यामुळे पश्चिम महाराष्ट्र आणि कोकण मार्गाला होणारी या मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली आहे. गेल्या वीस तासाहून अधिक काळ दरडोळ करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या वर्षीच्या पावसाळ्यातील दरड कोसळण्याची ही या भागातील पहिलीच घटना आहे. कोल्हापूर जिल्ह्याला जोडणाऱ्या राजापूर तालुक्यातील अणुस्कुरा घाटात काल सायंकाळी दरड कोसळल्याने वाहतूक खोळंबली आहे. दरम्यान काल सायंकाळी साडेसहा वाजता पडलेली दरड काढण्याचे अद्यापही सुरू आहे. यामुळे तब्बल १५ तासांहून अधिक काळ रस्ता बंद असल्याने या मार्गावरील वाहतूक पर्यायी मार्गाने वळवण्यात आली आहे. काल दिवसभर राजापूर तालुक्यात पावसाची रिपरिप सुरू होती.

# आत्महत्याग्रस्त तरूणांच्या कुटुंबीयांना गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठान देणार मदतीचा हात

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** लोकसभेत झालेला पराभव जिव्हारी लागल्याने काही ठिकाणी तरूणांनी आत्महत्या केल्याच्या प्रकाराबद्दल भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांनी गंभीर चिंता व्यक्त करून हळहळ व्यक्त केली आहे. मी हात जोडून तुम्हाला विनंती करते, असा जीव देवून भागणार नाही बाळांनो.. माझी शपथ आहे तुम्हाला स्वतःच्या जीवाचं काहीही बर वाईट करून घेऊ नका असे आवाहन पुन्हा एकदा त्यांनी केलं आहे. दरम्यान आत्महत्या केलेल्या तरुणांच्या मुला बाळांचं पालनपोषण करण्याची जबाबदारी गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानने घेतली असून लवकरच त्यांना मदत दिली जाणार आहे.

नुकत्याच झालेल्या. निवडणूकीत पंकजाताई मुंडे यांचा अगदी थोड्या मतांनी पराभव झाला पण हा पराभव सहन न झाल्याने काही ठिकाणी तरूणांनी आत्म हत्या केल्याच्या घटना घडल्या. मन सुन्न करणाऱ्या या घटनांनी पंकजाताई मुंडे यांनी तरूणांच्या कुटुंबीयांशी तात्काळ दूरध्वनीवरून संपर्क साधून त्यांच्या प्रती संवेदना व्यक्त केल्या. घरातील तरूणांनी आत्महत्या केल्याने त्यांच्या कुटुंबीयांच्या पालनपोषणाची जबाबदारी गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानने घेतली आहे, त्यांना प्रतिष्ठान मार्फत मदत दिली जाणार आहे. माझी शपथ आहे तुम्हाला, स्वतःच्या जीवाचं बरंवाईट करून घेवू नका. पंकजाताई मुंडे यांनी एक व्हिडिओ शेअर करून तरूणांना आवाहन केलं आहे. त्या म्हणाल्या, काय बोलू, मी तुमच्या सगळ्यांशी हे कळत नाही. मी आवाहन केले, माझं आवाहन तुमच्या दुःखाच्या, नैराश्याच्या पलीकडे ते आवाहन पोहोचत नाही की काय, असं दिसत नाही. गेल्या काही दिवसांत ज्या तरुणांनी आत्महत्या केल्या, या घटनांनी मी जेवढी खचले तेवढं कदाचित कोणी कोणी खचलं नसेल. मी अहमदपूरमधल्या त्या तरुणाच्या आईशी बोलले, ती माऊली म्हणाली की, ताई तुम्ही टेन्शन घेऊ नका, त्याचा तुमच्यावर खूप जीव होता. इतकं प्रेम याला मला शब्द सापडत नाहीत. कदाचित तुम्ही माझ्यावर अघोरी प्रेम करताय. प्रत्येकक्षणी एक-एक कर्ज माझ्यावर चढवत आहात. तुम्ही मला पाहिलंय, गेली २०-२२ वर्षात, मुंडे साहेबांसारख्या पहाडासारख्या नेत्याला मी भावनिक होताना पाहिलं आहे, मी त्यांना आधार दिला. मी त्यांना आधार देण्याइतकी मोठी नाही. पण मी आधार द्यायचा भाव आणला, कारण त्यांना वाटायला नको की, आपल्याला मुलगी आहे आणि ती खूप कोमल आहे. नाही बाबा, मी खूप कठीण आहे, कर्मठ आहे, मी तुमच्यासाठी लढायला मागे हटणार नाही. ४ जूनला मुंडेसाहेब गेले तो दिवस आठवा, दगडं पडत होती सगळ्यांच्या डोक्यावर, पण मी धावत जाऊन माईक हातात घेतला, जीवाची पर्वा केली नाही. कोणाचाही विचार केला नाही, विचार केला समाज चेंगरेल, अनेक जीव जातील, याचा केला. तेव्हा मी तुम्हाला मुंडे साहेबांची शपथ दिली, ती शपथ तुम्ही पाळली. आता, जे काही झालं ते तुमच्या जीवाला लागलं आहे, पण तुम्ही असं जिव्हारी लावून घेणार असाल आणि अशा रस्त्यावर जाणार असाल तर, माझी शक्ती बनण्यापेक्षा असं पाऊल उचलणार असाल तर मला राजकीय पाऊल उचलताना मला प्रश्न पडतो. माझ्या राजकारणात स्वार्थ नाही, माझं आजपर्यंतचं राजकारण उद्देशाचं होतं, जेव्हा पद मिळालं तेव्हा गरिबांसाठी काम केलं, नाही मिळालं तेव्हा ती गोष्ट हसतखेळत झेलली. हे राजकारण आहे, राजकारणात अशी वेळ येत असते. आतापर्यंतच्या इतिहासात थेटपणे एखाद्या व्यक्तीला, वर्णाला हीन लेखून प्रचार झाला नाही, ते तुमच्या जिव्हारी लागलं आहे, हे मला माहिती आहे. आपल्याला वंचितांचा आवाज बनायचं आहे, आपल्याला त्या सगळ्यांना ताकदी देणारी फौज बनायचं आहे. असं जीव देऊन भागणार नाही रे बाळांनो, मग मी कसं काम करु, मी तुम्हाला हात जोडून विनंती करते, मी तुमच्याकडे यायलेय, पण माझा पायच उचलत नाही, सांत्वनासाठी माझ्याकडे शब्द नाहीत. मी येत आहे. कृपा करुन माझी शपथ आहे तुम्हाला, मी साहेबांची शपथ घालून पाहिली, पण स्वतःच्या जीवाला काही करुन घेऊ नका, असे आवाहन पंकजाताई मुंडे यांनी केले आहे.

# बामणी प्रोटिन्सच्या कामगारांना न्याय द्या : डॉ. अभिलाषाताई गावतुरे

आधुनिक केसरी न्यूज

**बामणी :** मागील 24 दिवसापासून बामणी येथील बामणी प्रोटीन्स लिमिटेडच्या कामगारांचे आंदोलन सुरू आहे. बामणी येथील बामणी प्रोटिन्स लिमिटेड हा उद्योग सन 1998 पासून चालू आहे. जवळपास अडीचशे ते ३०० स्थायी कामगार या उद्योगाद्वारे आपला उदरनिर्वाह करीत होते मात्र पर्यावरणवादी श्री राजेश वारलुजी बेले यांच्या प्रदूषण विषयक तक्रार वरून प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी दि. 13 मार्च 24 रोजी हा उद्योग लॉक आउट कारवाईद्वारे बंद केला त्यात रीतसर सुधारणा करून उद्योग पूरक करण्याचे निर्देश दिले मात्र बामणी प्रोटीन्स लिमिटेड द्वारे यावर कोणतीही हालचाल करण्यात आली नाही. त्यानंतर कंपनी व्यवस्थापना तर्फे प्रदूषण विषयक सुधारणा केल्यानंतर उद्योग सुरू करणे अपेक्षित होते परंतु तसे न करता व्यवस्थापनाने नफ्यात असलेला उद्योग आर्थिक व तांत्रिक दृष्ट्या चालण्यास असमर्थ असल्याचे कारण सांगून कायमस्वरूपी बंद करण्याचा निर्णय घेतला यामध्ये कामगाराची कोणतीही चूक नसताना नाहक त्यांना त्रास सहन करून उपासमारीची वेळ त्यांचे व त्यांच्या कुटुंबावर आली आहे. यामध्ये कामगारांना आणि कामगार युनियनला विचारात न घेता कंपनीने जो एकतर्फी निर्णय घेऊन कंपनी बंद केली. हा अतिशय अन्यायकारक निर्णय आहे आजी आंदोलनाला आंदोलनाला समाजसेवी सुप्रसिद्ध बालरोग तज्ञ डॉ. अभिलाषा गावतुरे यांनी कामगारांच्या आंदोलनाला भेट देऊन त्यांना जाहीर पाठिंबा दिला. आधीच नागरिकांना हाताला काम नाही त्यात एखादा सुरू असलेला उद्योग प्रकल्प अशा पद्धतीने बंद होत आहे ही गंभीर बाब असून गेल्या 10 वर्षापासून हे कामगार येथे काम करीत आहे आणि आज 24 दिवस झाले यांच्या कडे कोणी लक्ष देत नाही व बंद करण्याचे कारण ही आगळे वेगळे आहे. सर्व प्रदूषण कारणाची पूर्तता करून देखील कंपनी सुरू होत नाही. यामध्ये कंपनी व्यवस्थापनाने लक्ष देऊन काम पुन्हा चालू करून कामगारांना कामावर रुजू करून घ्यावे याचबरोबर मुख्यमंत्री, उद्योग मंत्री, पालकमंत्री यांनी जातीने या मध्ये लक्ष द्यावे, असे आवाहन डॉ.अभिलेषा गावतुरे यांनी केले.



# मी बीड विधानसभा निवडणूक लढणार : ज्योती मेटे

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** महाराष्ट्राच्या राजकारणात आगामी न काळात ट्रिस्ट येण्याचे संकेत आहेत. पं कारण बीडमध्ये मोठ्या घडामोडी त घडणार आहेत. भाजप नेत्या पंकजा - मुंडे यांचा लोकसभा निवडणुकीत पराभव झालाय. या पराभवानंतर पंकजा मुंडे या विधानसभा निवडणुकीच्या मैदानात उतरणार का ? हे आगामी काळात स्पष्ट होईल. पंकजा याआधी बीडच्या परळी विधानसभा मतदारसंघाच्या आमदार होत्या. पण सध्या तिथे राष्ट्रवादीचे धनंजय मुंडे हे आमदार आहेत. बीड विधानसभा मतदारसंघात सध्या शरद पवार गटाचे संदीप क्षीरसागर हे आमदार आहेत. त्यांचा कार्यकाळ आता पुढच्या सहा महिन्यांनी संपणार आहे. त्याआधी राज्यात विधानसभेची निवडणूक होईल. या निवडणुकीत बीड विधानसभा मतदारसंघातून शिवसंग्राम संघटनेचे दिवंगत नेते विनायक मेटे यांच्या पत्नी ज्योती मेटे या निवडणूक लढवण्यासाठी इच्छूक आहेत. तसेच शिवसंग्राम अनेक जागांवर निवडणूक लढवण्याची शक्यता आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात मोठे फेरबदल होण्याची शक्यता आहे. विनायक मेटे यांनी मराठा आरक्षणासाठी काम केलं आहे. त्यांच्या पक्षाकडून सातत्याने त्यासाठी प्रयत्न करण्यात आले आहेत. आता मराठा आरक्षणाचा मुद्दा तापलेला आहे. विशेष म्हणजे मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला आता एक महिन्याचा अल्टिमेटम देखील दिला आहे. त्यामुळे मराठा आरक्षणासाठीचं वातावरण तापलेलं राहिलं तर शिवसंग्राम पक्षाला त्याचा मोठा फायदा होऊ शकतो. आगामी विधानसभा निवडणूक शिवसंग्राम पूर्ण ताकतीने राज्यभरात लढणार आहे. मी बीड विधानसभा निवडणूक लढणार आहे, असं ज्योती मेटे म्हणाल्या आहेत. ४० वर्षांपासून बीडमध्ये अभिप्रेत असा विकास झाला नाही, याच मुद्यावर बीड विधानसभा निवडणूक लढणार आहे. कोणतीही निवडणूक दोन समजपुरती नसते. मतदार हा मतदारच असतो. जातीपातीच्या पलीकडे जाऊन या निवडणुकीकडे पाहायला हवं, आणि आपला सलोखा कायम राखायला हवा, अशी मेटे यांनी मांडली आहे. भूमिका ज्योती मराठा आरक्षणासंदर्भात सरकारने जानेवारी महिन्यातच अधिसूचना काढली होती. त्यावर निर्णय घेणं सरकारचं कर्तव्य आहे. शासन म्हणून त्यांनी ते पार पाडलं पाहिजे. राजकारणातल्या काही गोष्टी लगेच उघड करायच्या नसतात, असं ज्योती मेटे म्हणाल्या. भाजप नेत्या पंकजा मुंडे आभार दौरा काढत आहेत. अतिशय स्तुत्य उपक्रम आहे, असं मी म्हणेल. ३० जून रोजी दिवंगत विनायक मेटे यांची जयंती आहे. त्यादिवशी अभिनव संकल्प राबविणार आहे.

# महिलेला पोलीस ठाण्यातच मारहाण

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** बलात्काराची तक्रार देणाऱ्या महिलेला पोलीस ठाण्यात पोलीस उपनिरीक्षक, तसेच महिला पोलीस कर्मचाऱ्यांनी मारहाण केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. याबाबत पीडित महिलेने तक्रार दिल्यानंतर समर्थ पोलीस ठाण्यातील उपनिरीक्षकासह नऊ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

याप्रकरणी समर्थ पोलीस ठाण्यातील उपनिरीक्षक अर्जुन दिवेकर, हवालदार नीलम कर्पे, माया गाडेकर, योगिता आफळे, दोन महिला पोलीस शिपाई, तसेच अक्षय जीवन आवटे (वय ३१, रा. सोमवार पेठ), आदित्य गौतम (वय ३०, रा. साततौटी चौक, कसबा पेठ), सुजीत पुजारी (रा. आंबेगाव बुद्रुक) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एका महिलेने समर्थ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार समर्थ पोलीस ठाण्यातील उपनिरीक्षकासह अन्य आरोपींविरुद्ध विनयभंग, मारहाण, धमकी दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिलेने याबाबत पोलिसांकडे तक्रार दिल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला. सहायक पोलीस निरीक्षक दादासाहेब पाटील तपास करत आहेत.



# मुल -पालक यांच्यातील सुसंवाद गरजेचा : मिताली लाठी

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** मुल आणि पालक यांच्यामध्ये केवळ संवाद गरजेचा नसुन सुसंवाद गरजेचा आहे. सोशल मीडियाच्या या काळात पालक आणि मुलांनी मोबाइलचा वापर आवश्यकतेपुरताच करावा. मोबाइल अडिक्शनचे परिणाम व्यसनाधीनतेपेक्षाही घातक असल्याने सोशल मीडियाच्या अधीन आजची मुले जावून त्यांचे शैक्षणिक नुकसान तर होत आहेच सोबत त्यांचा पालकांसोबतचा सुसंवाद खुंटत चालला आहे, असे प्रतिपादन मिताली लाठी यांनी अंबाजोगाई येथील माहेश्वरी समाजाच्या वतीने आयोजित मिले सुर मेरा तुम्हारा या कार्यक्रमात केले. याबाबत सविस्तर असे की, महेश नवमी निमित्त अंबाजोगाई तालुका माहेश्वरी समाजाच्या वतीने मिले सुर मेरा तुम्हारा हा कार्यक्रम येथील विलासराव देशमुख सभागृहात दि. १३ जुन रोजी आयोजित करण्यात आला होता. यावेळी उपस्थितांशी संवाद साधताना मिताली लाठी म्हणाल्या की, आजकाल सोशल मीडियाचा बोलबाला असल्याने प्रत्येक जण सोशल मीडियावर व्यस्त आहे. यामुळे मुल आणि पालक यांच्यातील संवाद खुंटत चालल्याने अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. अनेकजण स्क्रीन अडिक्शनचे बळी पडत आहेत. यामुळे मुलांसोबत पालकांनी सुद्धा मोबाइलचा वापर कमी करुन आपल्या मुलांसोबत सुसंवाद साधावा. आपल्या वैयक्तिक आयुष्यातील गोष्टी सोशल मीडियावर सार्वजनिक करु नयेत. आठवड्यातून एक दिवस मोबाइल पूर्णपणे वर्ज्य करावा. कुटुंबातील सुसंवाद हाच अनेक कौटुंबिक समस्यांवरील उपाय आहे. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक माहेश्वरी समाजाचे जिल्हा सचिव जगदीश जाजू यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन दिपा धुत यांनी तर आभार प्रदर्शन नेतल थुत यांनी केले. यावेळी माहेश्वरी समाजाचे जिल्हाध्यक्ष ॲड. श्रीकृष्ण तोष्णीवाल, जिल्हा सचिव सतीश तोष्णीवाल, जिल्हा महिला अध्यक्ष पुनम जाजु, तालुकाध्यक्ष दत्तप्रसाद लोहिया, तालुका महिला अध्यक्ष शिवकन्या रांदड व माहेश्वरी समाजातील शालेय मुले व पालक मोठया संख्येने हजर होते.



## सिने अभिनेता विजय मानवतकर यांचा कला सन्मान समाज भूषण पुरस्काराने गौरव

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**फुलंब्री :** अण्णा भाऊ साठे साहित्य व कला अकादमी नागपूर यांच्या विद्यमानाने तिसरे राज्यस्तरीय साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे साहित्य व कला संस्कृती संमेलन 2024 कला सन्मान समाज गौरव पुरस्कार विजय मानवतकर यांना प्रदान करण्यात आला यावेळी अकादमीचे अध्यक्ष चंद्रकांत वानखडे सो वानखेडे संजय जी ठोसरसुधाताई बावणे वच्छला खडसे संगीता खडसे व इतर मान्यवर यांच्या शुभ हस्ते विजय मानवतकर यांना सन्मान सत्कार व कला रत्न समाजभूषण पुरस्कार अण्णा भाऊ साठे साहित्य व कला अकादमी नागपूर कार्यालय येथे प्रदान करण्यात आलाउपस्थित सर्व मान्यवरांनी सिने अभिनेता विजय मानवतकर यांचे कौतुक प्रशंसा केली तसेच सर्व मान्यवरांचे व अकादमीचे विजय मानवतकर यांनी आभार व्यक्त केले व यापुढेही आपण जनहितार्थ व समाजाच्या हितासाठी ऊर्जा वाहक कार्य करीत राहू असे सांगितले.

## नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर राज्यस्तरीय शिक्षण परिषदेचे आयोजन

### १७ जून रोजी एकदिवसीय शिक्षण परिषद

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** समकाळातील शिक्षणविषयक समस्या आणि चालू शैक्षणिक वर्षापासून लागू होत असलेल्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे एस. सी., एस.टी., ओबीसी तसेच धार्मिक अल्पसंख्याक यांच्यावर होणारे परिणाम यासंबंधीचे चिंतन करण्यासाठी नांदेडात एकदिवसीय राज्यस्तरीय शिक्षण परिषदेचे आयोजन सोमवार १७ जून २०२४ रोजी करण्यात आले आहे. या परिषदेच्या अध्यक्षपदी भारतीय शोषित पिछडा संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष एस. जी. माचनवार हे राहणार असून भारतीय शिक्षण व्यवस्थेचे अभ्यासक फारुख अहमद यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन होणार आहे. यावेळी मराठवाड्यातील सुप्रसिध्द उद्योजक बालाजी इबितदार यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. शहरातील शिवाजी नगर येथील नाना नानी पार्क नजिकच्या विसावा पॅलेस कॉन्फरन्स हॉल मध्ये सकाळी १० वा परिषदेचे उद्घाटन होईल. त्यानंतर पीअर फाऊंडेशनचे डॉ. हेमंत कार्ले यांच्या अध्यक्षतेखाली दुसरे सत्र संपन्न होईल. या सत्रात नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- २०२० : हीत कुणाचे? या विषयावर छत्रपती संभाजीनगर येथील प्रा. डॉ. प्रभाकर गायकवाड आपले अभ्यासपूर्ण विवेचन करतील. भोजन अवकाशानंतर दुपारी २.३० वा. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० आणि उच्चशिक्षणः एक दृष्टिक्षेप या विषयावर यशवंत महाविद्यालयाच्या उपप्राचार्या प्रा. डॉ. कविता सोनकांबळे ह्या आपले चिंतन मांडणार आहेत. या सत्राच्या अध्यक्षस्थानी फुले - शाहू- आंबेडकरी चळवळीचे अभ्यासक तथा लसाकमचे प्रदेशाध्यक्ष बालाजी थोटवे यांची उपस्थिती राहणार आहे.

चौथ्या सत्रात दुपारी ४.०० वा प्रश्नोत्तरे, चर्चा तसेच शैक्षणिक संवादाचे आयोजन करण्यात आले आहे. हे शेवटचे सत्र असून या सत्रात परिषदेतील सहभागी शिक्षक प्राध्यापकांच्या प्रश्नांना उत्तरे दिली जातील. यावेळी एस. जी. माचनवार, प्रा. डॉ. प्रभाकर गायकवाड, प्रा. डॉ. कविता सोनकांबळे यांची उपस्थिती राहणार आहे. सदरील परिषदेला पूर्ण वेळ उपस्थित राहण्याचे आवाहन प्रज्ञाधर ढवळे, सतिशचंद्र शिंदे, संजय मोरे, श्रीमंत राऊत, राजेश चिटकुलवार, माधव कांबळे, संजय मोरे, निरंजन तपासकर, पांडुरंग कोकुलवार, मारोती कदम, शंकर गच्चे, बाबुराव कापसे, रविंद्र बंडेवार, दिलीप काठोडे, नागोराव डोंगरे, कैलास धुतराज, रणजित गोणारकर, चंद्रकांत कदम यांच्यासह संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.



## भारंबावाडी येथील सामान्य कार्यकर्त्यांची मोदींच्या शपथविधी सोहळ्याला उपस्थिती

आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर :** भारंबावाडी, ता. कन्नड येथील एका सामान्य कार्यकर्त्याला पंतप्रधान शपथ विधी सोहळ्याला उपस्थितीत राहणाचे निमंत्रण देण्यात आले होते. राष्ट्रपती भवन येथे नुकताचपंतप्रधान नरेंद्र मोदी व मंत्रीमंडळाचा दिमाखदार शपथविधी सोहळा संपन्न झाला.

यासाठी भारंबा वाडी येथील सामान्य कार्यकर्ते प्रा. काकासाहेब आडे यांना निमंत्रणपत्र पाठविण्यात आले होते. तसेच ते या सोहळ्यास उपस्थित राहिले. भारंबा वाडी हे दुर्गम डोंगराळग्रस्त गाव आहे. आजही येथे मोबाईल नेटवर्क पोहचलेले नाही. बाजार पेठांमध्ये जाण्यायेण्यासाठी चांगले रस्ते नाही. अशा भागात राहणाऱ्या सर्वसाधारण कार्यकर्त्याला अशा मोठ्या भव्यदिव्य सोहळामध्ये आमंत्रित करण्यात आले होते. भारतीय जनता पार्टी मध्ये सर्वसाधारण कार्यकर्त्याला न्याय मिळतो हे यावरून सिद्ध होते अशी प्रतिक्रीया श्री आडे यांनी दिली. तसेच सर्व प्रथम विमान प्रवास केल्याने उत्साह निर्माण झाल्याचे सांगितले, तसेच इतक्या मोठया कार्यक्रम ला सर्वसाधारण कार्यकरत्याला बोलविल्याने अभिमान वाटले, या मिळालेल्या संधी बद्दल भाजप जिल्हा अध्यक्ष संजय खंबायते, जेष्ठ नेते डॉ. संजय गव्हाणे, तालुकाध्यक्ष किशोर आबा पवार, सुनील पवार, सुभाष काळे, प्रदिप बोडखे, सुदाम पवार, आदिंसह तालुका पदाधिकारी मित्र मंडळ, नातेवाईक यांनी अभिनंदन केले आहे.

## आई-वडिलांची अभिमानाने मान उंचावेल असे कर्तृत्व गाजवा : वसंत हंकारे

आधुनिक केसरी न्यूज



**परतूर :** आई-वडिलांची अभिमानाने मान उंचावेल असे कर्तृत्व गाजवा. आई-वडिलांची काळजी घ्या. आई-वडील हेच आद्य दैवत आहे. त्यांचे पूजन करा. प्रेमाने संवाद साधा, असे उद्गार वसंत हंकारे यांनी काढले.जेथलिया मित्रमंडळ आयोजित गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समरंभ प्रसंगी बोलत होते.

परतूर तालुक्यातील सन 2023-24 या शैक्षणिक वर्षात, इयत्ता दहावी, बारावी, जेईई, नीट सह स्पर्धा परीक्षेत विशेष प्रविण्यासह सर्वेत्कृष्ट गुणप्राप्त विद्यार्थी-विद्यार्थिनीं चा सत्कार समारंभ पार पडला. याप्रसंगी याप्रसंगी व्यसपीठावर माजी आमदार सुरेशकुमार जेथलिया,नितीन जेथलिया,प्रा. माजिद सर, प्रविण जेथलिया, माजी नगराध्यक्षा विमलताई जेथलिया काँग्रेस चे तालुकाध्यक्ष बाबाजी गाडगे,एकनाथ कदम,नगर सेवक बाबुराव हिवाळे, सादेक खतीब, सिद्धार्थ बंड, राजेश भुजबळ, राजेश खंडेलवाल, जि. प सदस्य इंद्रजित घनवट,दत्ता बनसोडे,बाजीराव खरात, मंजुळदास सोळंके, लक्ष्मण शिंदे पांडुरंग गाडगे, अविनाश शहाणे, सादेक भाई जहागीरदार, हाजी रहेमात खान, अजीम कुरेशी, मोहसीन जमीनदार, सारिका ताई वरणकर, खाडे मॅडम,

प्रा. पांडुरंग नवल, अशोकराव तनपुरे आदी उपस्थित होते.व्याख्यानात वसंत हंकारे म्हणाले, 'आई-वडिलांचे आपल्यावर अनंत उपकार असतात. त्यांची उतराई होण्यासाठी हाडाची काडे करा. त्यांना कधीही नाउमेद होऊ देऊ नका. तारुण्याच्या उंबरठ्यावर पाय घसरू देऊ नका.आदी मार्गदर्शनामुळे उपस्थित्यांच्या डोळ्यातुन अश्रू वाहत होते. आम्ही 1990 पासून शहरात गुणवंत विद्यार्थी, पत्रकार दिन या सारखे सत्काराचे कार्यक्रम करत आलेलो आहोत. या वर्षी पासून आदर्श शिक्षकांचा सत्कार समारंभ सुरु केलेला असून तो दरवर्षी सुरु राहील असे मा. आमदार सुरेशकुमार जेथलिया यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नितीन जेथलिया यांनी केले. सूत्रसंचालन राजेश मंत्री तर बाबाजी गाडगे यांनी आभार मानले.

## वाळूचोरी निषेधार्थ पाण्याच्या टाकीवरील उपोषण मागे; चित्ते यांनी प्रशासनास धरले धारेवर



आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव राजा :** अवैध वाळू उपसा मुळे नदीपात्रात पडलेल्या खड्ड्याचे मोजमाप करा या मागणीसाठी निमगाव गुरु येथील पाण्याच्या टाकीवर उपोषणाला बसलेल्या शिवसेना तालुकाप्रमुख अनिल चित्ते यांनी (ता.१३) तिसऱ्या दिवशी प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर आपले उपोषण अखेर मागे घेतले.

सिंदखेडराजा व देऊळगाव राजा तालुक्यातील खडकपूर्णा नदीपात्रातून होत असलेल्या अवैध रेती उत्खन्न मुळे पडलेल्या खड्ड्यांचे मोजमाप करून कारवाई करा तसेच सिंदखेडराजा तालुक्यातील निमगाव वायाळ येथील नदीपात्रातील पडलेल्या खड्ड्याचे मोजमाप झाल्याचा अहवालाची प्रत द्या, या मागणीसाठी शिवसेना तालुकाप्रमुख अनिल चित्ते हे सोमवारी निमगाव गुरु येथील पाण्याच्या टाकीवर उपोषणास बसले होते. दरम्यान आज तिसऱ्या दिवशी केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांचे पुतणे युवा सेना नेते योगेश जाधव यांच्या मध्यस्थीने उपविभागीय अधिकारी, तहसीलदार,मंडळ अधिकारी,तलाठी यांचे शिष्टमंडळ उपोषण स्थळी पोहोचले व त्यांनी अनिल चित्ते यांना चर्चेसाठी खाली येण्याची विनंती केली. यावेळी चित्ते यांनी नदीपात्रात पडलेल्या खड्ड्यांची मोजमाप करण्यास टाळाटाळ करणाऱ्या महसूल अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. चर्चेअंती नदीपात्रात पडलेल्या खड्ड्यांचे मोजमाप करण्याचे लेखी पत्र प्रशासनाने दिल्याने सदर उपोषण तिसऱ्या दिवशी मागे घेण्यात आले.यावेळी युवासेना नेते योगेश जाधव, उपजिल्हाप्रमुख दीपक बोरकर, रंजीत काकड, तुषार शिंपणे, राजू सपाटे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.



# जटवाडा-रसुलपूरा घाटात दरड कोसळण्याचा प्रकार

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** यंदा पहिल्याच पावसात जटवाडा रसुलपूरा घाटात दरड कोसळण्याचा प्रकार घडलं असल्याने विभागाने याकडे लक्ष घालून पाहणी करून होत असलेला प्रकार थांबवाण्याबाबत उपाययोजना करण्याची मागणी वाहनधारकांतुन होत आहे. रोहिणी-मृग नक्षत्राच्या पावसाच्या सुरुवातीलाच जटवाडा रसुलपूरा घाटात परवा अचानक मोठी पाचसहा दगडं रस्त्यावर आली. परंतु ते दरड भिंती लगतच पडल्याने पुढील अनार्थ टळाला.नसता दुर्दैवी घटना घढण्यास वेळ लागला नसता सार्वजनिक बांधकाम उपविभागीय कार्यालय खुलताबाद अंतर्गत हा रस्ता घाट असुण विभागाने या रस्ता लगत असलेल्या दोन्ही बाजूंच्या दरडभिंतीची पाहणी करून सुरक्षाचे उपाय योजना कराव्या जेने करुन वाहनधारक नागरिकांना सुरक्षा सुरक्षित प्रवेश घडेल. दोन्ही कडून जटवाडा व रसुलपूरा घाट वर चढताना सावधनतेची सूचना फलक लावण्यात यावे.गत वर्षी लाखों रुपये खर्च करून दरड लगत सुरक्षा म्हणून लोखंडी सुरक्षा टाकण्यात मात्र तेथे दरड न कोसळता त्याच्या मागे दरड कोसळली आहे. विभागाने तातडीने लक्ष घालण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.

# काँग्रेस पक्ष संघटन मजबूत करणार : अंजूम पटेल

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** नुकत्याच झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत राज्यात काँग्रेस पक्षाला



मिळालेल्या यशामुळे काँग्रेसमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून अनेक जण या पक्षात येण्यासाठी आकर्षित होत असल्याने युवकांनी मोठी फळी उभी करून नेवासा तालुक्यात काँग्रेस पक्ष संघटन मजबूत करणार असल्याचे काँग्रेस कमिटीचे नेवासा शहराध्यक्ष अंजूम पटेल यांनी सांगितले.
यावेळी काढलेल्या प्रसिद्धी पत्रकात काँग्रेस शहराध्यक्ष अंजूम पटेल यांनी म्हटले आहे की काँग्रेस पक्ष संकटात असतांना माझ्यासह पक्षाच्या काही निष्ठावंत कार्यकर्त्यांनी पक्षात राहून लोकसभेच्या निवडणुकीत पक्षाशी निष्ठा ठेऊन लोकसभेच्या निवडणूकीत काम केले.काँग्रेस पक्ष हा सर्व जातीधर्माच्या लोकांना बरोबर घेऊन जाणारा धर्मनिरपेक्ष पक्ष असून आज ही सर्वसामान्य जनता,दिन दलित अठरापगड जातीसह मुस्लिम समाज बांधव काँग्रेसच्या पाठीशी भक्कमपणे उभे असल्याचे लोकसभेच्या निवडणुकीत स्पष्ट झाले आहे. महाराष्ट्रभर आज काँग्रेस पक्षाकडे लोक आकर्षित होत असताना एकेकाळी काँग्रेसचा बालेकिल्ला असलेल्या नेवासा तालुक्यात काँग्रेसला पुनरवैभव प्राप्त करून देण्यासाठी अल्पसंख्याक विभागाचे राज्य उपाध्यक्ष अभिजित लुणिया, काँग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष अण्णासाहेब पटारे,माजी अध्यक्ष संभाजीराव माळवदे, काँग्रेस कमिटीच्या परिवहन विभागाचे जिल्हाध्यक्ष संदीप मोटे, महिला आघाडी अध्यक्षा शोभाताई पातारे यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांना बरोबर घेऊन करणार असल्याचा निर्धार शहराध्यक्ष अंजूम पटेल यांनी व्यक्त केला आहे.

# केंद्रीयमंत्री जाधव यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव राजा :** जिल्ह्याचे खासदार भूमिपुत्र प्रतापराव जाधव यांची केंद्रीयमंत्री (स्वतंत्र प्रभार) निवड झाल्याबद्दल जिल्हा युवा सेने तर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. केंद्रीय मंत्रिमंडळात निवड झाल्यानंतर प्रथमच त्यांचे शेगाव येथे आगमन प्रसंगी युवासेना उपजिल्हाप्रमुख शिवाजी कुहिरे यांनी स्वागत केले. बुलढाणा जिल्ह्याला प्रथमच केंद्रीय मंत्रिमंडळात स्वतंत्रदर्जाचे मंत्रीपद मिळाल्यानंतर केंद्रीय मंत्री खासदार प्रतापराव जाधव यांचे शेगाव येथे जल्लोषात स्वागत करण्यात आले. जिल्हाभरातून आलेल्या महायुतीच्या कार्यकर्त्यांच्या सहभागाने गजानन महाराजांच्या नगरीत केंद्रीय मंत्रीपदी निवड झाल्याबद्दल लाडू तुला, पुस्तक तुला, फटाक्याची आतषबाजी व ढोल ताशांच्या गजरात त्यांचे स्वागत करण्यात आले.

# कंधार शहरातील पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी भाजपचा घागर मोर्चा

आधुनिक केसरी न्यूज



**धोंडीबा मुंडे**
**कंधार :** शहरांमध्ये गेल्या अनेक दिवसांपासून पाणीपुरवठा होत नसल्याने नागरिक हैराण झाले आहेत तर महिलांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे, यामुळे भारतीय जनता पार्टीच्या कंधारच्या वतीने कंधार नगरपालिकेवर घागर मोर्चा काढून निवेदन देण्यात आले. यावेळी निषेध करत ॲड. गंगाप्रसाद यन्नावार यांनी नगरपालिकेमध्ये प्रतिकात्मक आंघोळ करत नगरपालिकेचा निषेध केला.
तालुक्यात मुबलक पाणीसाठा उपलब्ध असून एका बाजूस जगतुंग समुद्र व दुसऱ्या बाजुस मन्यानदी आहे,शहरासाठी पाणीपुरवठा करन्या करिता २६ कोटी रुपयांची लिंबोटी धरणातून कायम स्वरूपी पाणीपुरवठा करण्यासाठी उपाय योजना करण्यात आली होती. ती अद्यापही अपूर्ण अपूर्ण आहे. नगरपालिकेच्या गलथन कारभारामुळे व नियोजनाच्या अभावामुळे वारंवार पाणीपुरवठा हा विस्कळीत होत आहे, त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना त्याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे,तर महिलांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे, अशा नगरपालिका प्रशासनाच्या गलथान कारभाराचा आम्ही निषेध करत नगरपालिका प्रशासनास दि,१४ जुन रोजी निवेदन देण्यात आले.
या निवेदनात नगरपालिका प्रशासना ने तात्काळ कंधार शहरातील पाणीपुरवठा सुरळीत करावा अन्यथा भारतीय जनता पार्टीच्या कंधारच्या वतीने नगरपालिका प्रशासनाच्या विरोधात घागर मोर्चा काढून तीव्र आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.
यावेळी ॲड. गंगाप्रसाद यन्नावार, मधुकर पाटील डांगे, निलेश गौर सतीश कांबळे ॲड. सागर डोंगरजकर, संतोष पदमवार, बालाजी दासू पवार, महंमद फारूक, अविनाश गित्ते, रामदास बाबळे, हनमंत डुमणे, चंदनफुले दत्तात्रय, शेखर वडजकर, रवी संगेवार, शुभम संगणवार यांच्यासह भाजपचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.



# आंबेडकरवादी संघर्ष समिती तालुका अध्यक्षपदी भालेराव

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** आंबेडकरवादी संघर्ष समितीच्या खुलताबाद तालुका अध्यक्षपदी रोहित रमेश भालेराव यांची नियुक्ती आंबेडकरवादी संघर्ष समितीचे अध्यक्ष श्रावण दादा गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आली यावेळी रामराव दाभाडे नानासाहेब शिंदे आंबेडकरवादी संघर्ष समितीचे जिल्हाध्यक्ष विनोद कासारे कार्याध्यक्ष संजय जाटवे मिलिंद मोकळे राहुल वाघमारे विनोद गाडगे करण कल्याण आदींची उपस्थिती होती.



# चाकरवाडी येथे माऊली भक्तांकडून 101 पोते साखर रवाना

आधुनिक केसरी न्यूज

**कळंब :** तेवीस वर्षांपासून सुरू असलेला डॉ.एल.जी. जाधवर प्रसिद्ध हृदय रोगतज्ज्ञ यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व कळंबकर माऊली भक्तांच्या वतीने, सहकार्यांने श्री क्षेत्र चाकरवाडी माऊली चरणी कळंब येथुन १०१ पोते साखर भरलेला टेंपो कळंब करांच्या शुभहस्ते श्रीफळ वाढवून रवाना करण्यात आला. गेल्या तेवीस वर्षा पासून माउळी भक्ता कडे साखर गोळा करून,चाकरवाडी येथील कार्यक्रमा साठी पाठवली जाते. साखर भरलेल्या वाहनांची माउली भक्ताच्या हस्ते पूजा करून रवाना करण्यात आली. यावेळी डॉ.एल. जी. जाधवर, पी.एस.आय. रामहारी चाटे, राजेश ओझा, राजेंद्र बिक्कड, दिलीप टोणगे, डॉ.अभिजित जाधवर, अशोक बोराडे, केंद्रे साहेब, युवराज मुरकुटे, माणिक बोंदर, पिनु जाधवर, डॉ.सचिन पवार, कुमार देशमुख उपस्थित होते.

# खुलताबाद तालुका, शहर काँग्रेस कमिटीच्या बैठकीचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद:** तालुका व शहर काँग्रेस कमिटीची आढावा बैठक दिनांक 15 जुन रोजी ११ वाजता हॉटेल पंचवटी, कोहिनूर कॉलेज जवळ, खुल्दाबाद येथे आयोजित करण्यात आलेली आहे. या बैठकीस प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष तथा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपाध्यक्ष मा. किरण पाटील डोणगावकर, मा.जगन्नाथ बापू खोसरे जिल्हा उपाध्यक्ष काँग्रेस कमिटी उपस्थित राहणार आहेत. या बैठकीस सर्व आजी माजी जि. प. सदस्य, पं. स. सदस्य, माजी नगराध्यक्ष व माजी उपनगराध्यक्ष, माजी नगर सेवक, सर्व फ्रंटलचे अध्यक्ष, सदस्य, पदाधिकारी व सर्व कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन अनिल पाटील श्रीखंडे, तालुकाध्यक्ष व अब्दुल समद टेलर शहराध्यक्ष यांनी केले आहे.

# समर्थ सेवेकऱ्यांचे गंगापूजन; गंगा गोदावरी मातेचा सन्मान

## विपुल पर्जन्यवृष्टीसाठी घातले साकडे

आधुनिक केसरी न्यूज

**बाजीराव सोनवणे**

**नाशिक :** अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ सेवा मार्ग व पुरोहित संघाच्या वतीने गत 50 पेक्षा अधिक वर्षांची परंपरा असलेला गंगापूजानाचा सोहळा आज मोठया मंगलमय व भावपूर्ण वातावरणात, गुरुमाऊली प. पू. अण्णासाहेब मोरे यांचे हस्ते व मान्यवरांच्या उवस्थितीत आणि राज्यभरातून प्रातिनिधिक स्वरूपात आलेल्या हजारो सेवेकरी व भाविकांच्या साक्षीने संपन्न झाला.रामकुंडावर झालेल्या या सोहळ्याने उपस्थितांना सिंहस्थ कुंभमेळ्याचीच अनुभूती दिली. याप्रसंगी रणजित सावरकर, अनिकेत शाश्त्री उपस्थित होते.

जेष्ठ महिन्याच्या शुक्ल प्रतिपदेपासून दशमी असे दहा दिवस भारतभर गंगा दशहरा उत्सव मोठया भावभक्तीने साजरा केला जातो. भारतात नद्यांना आम्ही मातेचा सन्मान दिला आहे. नदी जीवसृष्टीला सजीवत्व देते. पवित्रता, शुद्धता, निर्मळता, प्रक्षालन, परिष्कार, संयम, परोपकार, पापमुक्ती या सर्वांचं प्रतीक आपण गंगा गोदा मातेस मानतो. या मातेशी आपले मानसिक, अध्यात्मिक, सांस्कृतिक, वैज्ञानिक दृढ भावबंध युगानुयुगे घट्ट रुजले आहेत म्हणूनच आज जीवसृष्टीला नवचैतन्य देणाऱ्या गंगा गोदावरी मातेचे यथाससांग पूजन करून आपण सर्व तिचा सन्मान करत असल्याची भावना प पू गुरुमाऊलींसह सेवेकऱ्यांनी व्यक्त केली. गंगापूजनाच्या मुख्य सोहळ्यात पुरोहित संघांचे सतीश शुक्ल आणि सहकाऱ्यांनी राष्ट्रकल्याण, राष्ट्ररक्षण, सर्व जीवसृष्टीचे कल्याणाचे साकडे गुरुमाऊली व उपस्थित सेवेकऱ्यांच्या वतीने गोदामाईस घातले आणि मंत्रघोषात यथासांग गंगापूजन सर्वांकडून करून घेतले. गंगा गोदावरी मातेची आरतीही गुरुमाऊली यांचे हस्ते झाली.

याप्रसंगी उपस्थित सेवेकरी व भाविकांशी गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांनी हितगुज केले, "गोदामाई त्र्यंबकेश्वरी अवतरीत होऊन आंध्र प्रदेशातील राजमहेंद्रीस सागरास मिळते. तिने आपल्या तिरावरील दीड हजार किलोमीटरचा परिसर सर्वार्थाने सुजलाम सुफलाम केला आहे. राज्यात काही ठिकाणी तूरळक पाऊस झाला असला तरी मागील वर्षी तीव्र दुष्काळ पडल्याने आज सर्वत्र पाण्याचं दुर्भीक्ष जाणवत आहे. हंडाभर पाण्यासाठी



मैलोंमईल पायपीट करावी लागत आहे. येत्या पावसाळ्यात तरी पर्जन्यराजाने कृपा करावी यासाठी आपण गोदामाईच्या माध्यमातून पर्जन्यराजास विनंती केली तर तो निश्चितच आपणावर कृपा करेल . पर्जन्यराजाने कृपा करून सर्व जीवसृष्टीला नवचैतन्य द्यावे,विशेषतः शेतकरी सुखी, संपन्न व्हावा आणि शेतकरी राजाच्या आत्महत्या थांबाव्यात अशीच आपली मनोकामना आज गोदामाईकडे व्यक्त करत आहोत असे सांगून ती आपली हाक ऐकून निश्चितच आपली ही इच्छा पूर्ण करेल."असा विश्वासही गुरुमाऊली यांनी व्यक्त केला. विपुल पर्जन्यवृष्टी साठी देशभरातील सर्व स्वामी केंद्रावर एप्रिल महिन्यापासूनच पर्जन्य सूक्त पठण सुरु आहे व पावसाळा संपेपर्यंत ही सेवा सुरूच ठेवावी असा आदेशही गुरुमाऊलींनी देशभरातील करोडो सेवेकऱ्यांना दिला. आज सेवेकरी वर्गाने सर्वत्र गोदामाई आणि आपापल्या गावातील नदीवर जाऊन गंगापूजन करून सन्मान केलाच पण या दशहरा पुण्यकाळात आपापल्या गावातील नदी, नाले, तलाव स्वच्छ करून वृक्षारोपण करण्याचा कार्यक्रम सुद्धा महिला पुरुष सेवेकऱ्यांनी हाती घेतला आहे. या मुख्य सोहळ्याआधी दुपारी 3 ते 5 यावेळेत समर्थ गुरुपीठाचे महाव्यवस्थापक चंद्रकांतदादा मोरे यांचेसह सुमारे 400 महिला, पुरुष सेवेकऱ्यांनी गोदाकाठी स्वच्छता अभियान राबविले. 20 जुलै रोजी गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने नाशिक ते त्र्यंबकेश्वर पायी पालखी सोहळा आयोजित करण्यात आल्याची घोषणाही गुरुमाऊली यांनी केली.

# पेपर लीक, परीक्षा गैरव्यवहाराची चौकशी करण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज


**जळगाव जामोद :** 14 जून 2024 - जळगाव जामोद डॉक्टर्स असोसिएशनने राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना या वर्षाच्या नीट परीक्षेमध्ये कथित गैरव्यवहारांच्या चौकशीची मागणी करणारे एक निवेदन उपविभागीय अधिकारी जळगांव जामोद यांच्या मार्फत सादर केले आहे. या निवेदनात नीट परीक्षा घेणारी एजन्सी आणि केंद्र सरकारवर काही गंभीर आरोप करण्यात आले आहेत.

यात मुख्यतः नीट पेपर लीक : नेहमी टॉप करणारे विद्यार्थी हे दोन किंवा तीन असायचे पण यावेळी ६७ उमेदवारांनी संपूर्ण ७२० गुण मिळवल्याने पेपर लिक झाल्याची शंका व्यक्त करण्यात आली आहे. परीक्षा केंद्रातील अनियमितता : उच्च गुण मिळवणारे अनेक उमेदवार एकाच केंद्रातून आले, ज्यामुळे समन्वयित चीटिंगची शक्यता आहे. परीक्षांच्या व्यावसायिकीकरण यामध्ये अवैधपणे पेपर्स लीक करणे, अनधिकृत मुद्रण आणि परीक्षा प्रक्रियेमध्ये फेरफार करण्याचे आरोप करण्यात आले आहे. NTA द्वारे अनुचित ग्रेस मार्क्स,वेळ वाया गेल्यामुळे NTA ने १५६३ उमेदवारांना ग्रेस मार्क्स दिले, जर वेळ वाया गेला होता तर वेळ शिल्लक द्यायला हवे होते पण ग्रेस मार्क्स देणे हे अन्यायकारक आणि विघटनकारक आहे. या निवेदनाद्वारे तीन मुख्य मागण्या करण्यात आल्या आहेत. १) कथित पेपर लीक आणि गैरव्यवहाराची सखोल चौकशी करण्यात यावी. २) न्याय मूल्यमापनासाठी पुनर्परीक्षा घेण्यात यावी. ३) भविष्यातील अशी घटना टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात यावी. या निवेदनावर जळगाव जामोद डॉक्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.संदीप वाकेकर, उपाध्यक्ष डॉ.पी.आर. उमरकर, सचिव डॉ. संदिप देशमुख, बोर्ड मेंबर डॉ. शाकीर खान,डॉ. वैभव खिरोडकर, डॉ.पि.एल कपले, डॉ. राजेश वाकोडे, डॉ.अतुल उमाळे, डॉ.समाधान कपले, डॉ.प्रशांत दाभाडे, डॉ.अतुल उमाळे, डॉ. संदिप राखोंडे, डॉ. वैभव खिरोडकर , संदिप कापसे, डॉ सुभाष वाघ , प्रशांत गोतमारे, सागर उमरकर सर माऊली इंस्टिट्यूट, सलमान सर रिजवान सर सलमान सर क्रिएटर एकेडमी अनंत ठाकरे (निट स्टुडंट) आणि इतर शिक्षक, विद्यार्थी व पालक यांनी स्वाक्षरी केलेल्या या निवेदनात शैक्षणिक प्रणालीवरील विश्वास पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी त्वरित कारवाईची मागणी केली आहे.

# कुलगुरूपदी प्राचार्य डॉ. ज्ञानदेव म्हस्के

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीरामपूर :** रयत शिक्षण संस्था सातारा यांच्या वतीने नुकतेच नव्याने सुरू झालेल्या सातारा येथील डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील रयत विद्यापीठाच्या कुलगुरूपदी प्राचार्य डॉ. ज्ञानदेव म्हस्के यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



महाराष्ट्रातील शिक्षणक्षेत्रात अग्रगण्य असलेल्या सर्वात मोठ्या शिक्षण संस्थेच्या माध्यमातून सातारा येथे डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील रयत विद्यापीठाच्या कुलगुरूपदी प्राचार्य डॉ. म्हस्के यांची महाराष्ट्राचे राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस यांनी नुकतीच निवड केली आहे. प्राचार्य डॉ. म्हस्के हे सध्या सातारा येथील डॉ. धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालय येथे प्राचार्य आणि रयत शिक्षण संस्थेच्या उच्च शिक्षण विभागाचे सहसचिव म्हणून कार्यरत आहेत. सातारा येथे नव्याने स्थापन झालेल्या विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू म्हणून शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रो. डी. टी. शिर्के यांची नियुक्ती करण्यात आली होती. त्यानंतर ११ ऑक्टोबर २०२३ व १३ एप्रिल २०२४ च्या राज्यपालांच्या आदेशानुसार पुढील सहा-सहा महिन्यांकरीता त्यांच्याकडे कार्यभार सोपविण्यात आला होता. प्राचार्य डॉ. म्हस्के यांची नियुक्ती पदभार स्वीकारल्यानंतर पाच वर्षांच्या कालावधी करीता किंवा वयाची ६५ वर्षे पूर्ण करतील त्या दिवसांपर्यंत असणार आहे.

डॉ.म्हस्के यांचा प्राणीशास्त्र हा विषय असून त्यांचे पदवी शिक्षण श्रीरामपूर व पदवीनंतरचे शिक्षण अहमदनगर तेथे झाले आहे. त्यांनी पीएच.डी ही पदवी प्राप्त केली असून गेल्या १९ वर्षापासून ते प्राचार्य या पदावर कार्यरत आहेत. उत्कृष्ट शिक्षक, प्रभावी वक्ता, कार्यकुशल प्रशासक, नेतृत्व कौशल्यक म्हणून त्यांची रयत शिक्षण संस्थेत ख्याती आहे. त्यांनी विविध विषयांवर शोधनिबंध आणि पुस्तके प्रकाशित केली आहेत. त्यांची विविध विषयांवर शेकडो व्याख्याने गाजली आहेत. श्रीगोंदा आणि श्रीरामपूर येथील वरिष्ठ महाविद्यालयांचा उत्कृष्ट विकास करून उच्च नॅक नामांकन प्राप्त करून दिली आहेत. त्यांच्या नियुक्तीसाठी राज्यपालांनी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. एस. एस. मंथा यांच्या अध्यक्षतेखाली निवड समिती गठित करण्यात आली. रयत शिक्षण संस्थेचे माजी चेअरमन डॉ. अनिल पाटील, भारती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शिवाजीराव कदम, उच्च व तंत्र विभागाचे प्रधान सचिव विकास चंद्ररस्तोगी तसेच त्रिपुरा विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. गंगाप्रसाद प्रसाई हे निवड समितीचे सदस्य होते. त्यांच्या या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी यांनी अभिनंदन केले आहे.

# लोहा पालिकेने दिव्यांग लाभार्थ्यांना पाच टक्के राखीव निधी देण्याची प्रहारची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** शासनाच्या स्थानिक स्वराज्य संस्थेअंतर्गत दिव्यांग लाभार्थ्यांसाठी राखीव असलेला पाच टक्के निधी युडीआयडी धारक दिव्यांगाना तात्काळ उपलब्ध करुन देण्याची मागणी मुख्याधिकारी यांना निवेदनाद्वारे प्रहार संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

दरवर्षी शासनामार्फत राज्यातील दिव्यांग लाभार्थ्यांसाठी राखीव निधीची तरतूद करण्यात आली आहे. मात्र प्रशासकाच्या हलगर्जीपणा मुळे लाभार्थी वंचित राहत असल्याचे प्रकार अनेकदा समोर आले आहेत. लोहा नगरपरिष हद्दी अंतर्गत युडीआयडी प्रमाणपत्र धारक दिव्यांगासाठी स्थानिक स्वराज्य संस्था अंतर्गत दिव्यांगासाठीचा राखीव ५ टक्के निधी दिव्यांगाना तत्काळ उपलब्ध करून देण्याची मागणी लोहा पालिकेचे मुख्याधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. निवेदनावर लोहा प्रहार दिव्यांग संघटनेचे छोटूलाल सिद्दीवान, शिवाजी पांचाळ, विजय जोरूळे, विजय सिद्दीवान आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# मुंबई -गोवा मार्गावर दरडींची टांगती तलवार

आधुनिक केसरी न्यूज

**अलिबाग :** मुंबई गोवा महामार्गावर दरडीची टांगती तलवार कायम आहे. काही दिवसांपूर्वी महाडच्या नांगलवाडी येथे दरड रस्त्यावर आली होती. सुदैवानं यात कुठलीही जीवितहानी झाली नाही. त्यानंतर महामार्गावर दरडीचा मुद्दा प्रकर्षाने समोर आला. रस्त्यालगतचे डोंगर धोकादायक बनले असून, राष्ट्रीय महामार्ग विभागाचे त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे वेळीच याबाबत ठोस उपाययोजना करण्याची मागणी केली जात आहे.

मुंबई गोवा महामार्गाच्या रुंदीकरणाचे काम गेली १३ वर्षांपासून सुरू आहे. या महामार्गाचे रुंदीकरण करताना रस्त्यालगतचे डोंगर उभे आडवे कापण्यात आले आहेत. त्यामुळे या डोंगराची माती अतिवृष्टीत खचून रस्त्यावर येण्याची भीती आहे. या मातीबरोबर त्यात असणारे मोठे दगड, झाडे देखील कोसळू शकतात. त्यामुळे प्रवाशांच्या जीवाला धोका होऊ शकतो. सध्या महामार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना जीव मुठीत धरून प्रवास करण्याची वेळ आली आहे. रस्ता आणि डोंगर यामध्ये कुठलेच अंतर नाही त्यामुळे कोसळणारी दरड थेट रस्त्यावर येवू शकते.

यापूर्वी जुना रस्ता असताना देखील अशा प्रकारच्या घटना अनेकदा घडल्या आहेत. त्यावेळी वाहतूक बंद ठेवण्याशिवाय पर्याय नव्हता. महामार्गाचे रुंदीकरण करताना याबाबत कुठलीही उपाय योजना केल्याचे दिसून येत नाही. महामार्गावर नागोठणे ते कशेडी घाट या दरम्यान ६ ते ७ ठिकाणे दरड प्रवण आहेत. महाड आणि पोलादपूर तालुक्यात दरड प्रवण क्षेत्र अधिक आहेत. या दोन तालुक्यांमध्ये गेल्या २० वर्षांत अनेकदा दरडी कोसळल्या आहेत. ज्यात दोनशेहून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे या भागात दरडींचा धोका अधिक आहे.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in





# वादळी वाऱ्यासह पावसाने उडाली दाणादाण

## अनेक घरावरील टीनपत्रे उडून घरात घुसले पावसाचे पाणी

आधुनिक केसरी न्यूज

**विनोद पाटील बोडखे**

**रिसोड :** तालुक्यातील मोप महसूल मंडळातर्गत येत असलेल्या लोणी बुद्रुक, लोणी खुर्द, असोला, कण्हेरी, आदी गावांमध्ये काल दिनाक 13 जून रोजी संध्याकाळी 8 वाजता दरम्यान आलेल्या वादळी वाऱ्यासह आलेल्या मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी नुकसान झाले यामधे लोणी खुर्द येथील गजानन बोडखे, विश्वनाथ गिरी यांच्या राहत्या घरावरील टिन पत्रे उडून गेल्याने घरातील दैनंदिन उपजीविका भागविण्यासाठी लागणारे साहित्य जसे, गहू, ज्वारी, डाळी, यासह घरातील करमणुकीच्या वस्तू देखील अवकाळी आलेल्या पावसाने भिजून खराब झाल्या ऐन पाऊस येण्याच्या वेळेस विद्युत पुरवठा खंडित झाल्याने आणि रात्रीची वेळ असल्याने दैनंदिन उपजीविकेसाठी लागणाऱ्या वस्तू सुरक्षित ठेवता आल्या नाहीत. तसेच अनेक शेतकऱ्यांच्या शेतातील शेडनेट, हाऊस,ग्रीन नेट चे देखील मोठे नुकसान वादळी वाऱ्यासह आलेल्या मुसळधार पावसामुळे झाले.

तसेच लोणी बुद्रुक येथील नाल्याला मोठा पुर आल्याने नदी शेजारील असलेल्या पंडित बोडखे, पाडूरंग राऊत, अर्जुन बोडखे, शेषराव लांडगेसह अनेक शेतकऱ्यांच्या शेतातील बांध, फुटून गेल्याने शेतातील काळी मातीच वाहून गेल्याने शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. आता जमिनीतील मातीच वाहून गेल्याने खरीप पिकांची पेरणी करावी तरी कशी असा प्रश्न शेतकऱ्यांपुढे निर्माण झाला आहे. तसेच लोणी खुर्द येथील नुकसानीची माहिती महसूल तसेच पंचायत समिती कार्यालयाला कळताच तहसीलदार तेजनकर यांनी तलाठी, ग्रामसेवक यांची टीम लोणी खुर्द येथे पाठवून झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्याचे आदेश दिल्याने तलाठी धांडे, ग्रामसेवक, सोनुने यांच्या पथकाने नुकसान झालेल्या नागरिकांचे पंचनामे केले आहेत.

लोणी खुर्द येथे काल दिनाक 13 रोजी सायंकाळी झालेल्या वादळी वाऱ्यासह आलेल्या मुसळधार पावसामुळे जवळपास 14 हून अधिक नागरिकांचे नुकसान झाले यामधे घरातील साहित्य, तसेच घरावरील टिन पत्रे उडून गेली तसेच, भिंती पडल्या असे विविध प्रकारचे नुकसान झाले असून त्या घटनेचा संयुक्तिक पंचनामा करण्यात आला असून तो अहवाल तहसीलदार यांच्याकडे सादर करण्यात येणार आहे . यावेळी सचिव उषा सोनुने, सरपंच तान्हाजी गाडे, पोलीस पाटील संजू गाडे, यांच्यासह गावकरी उपस्थित होते . **कैलास धांडे, तलाठी साजा लोणी बुद्रुक**

काल झालेल्या मुसळधार पावसामुळे लोणी बु येथील गावालगत असलेल्या नाल्यालगत पाणी जाण्यासाठी मोकळी जागा नसल्याने पाणी अडून शेतात घुसल्याने बांध फुटून शेतातील गाळ पाण्याच्या प्रवाहा बरोबर वाहून गेला आता खरीप पिकांची पेरणी करायची कशी असे संकट आमच्या समोर उभे आहे .नेहमीच आमच्या शेतात पाणी घूसण्याचा प्रकार घडत असून याकडे प्रशासनाने लक्ष देऊन प्रश्न कायम स्वरुपी मार्गी लावावा . **पंडित बोडखे, शेतकरी लोणी बुद्रुक**

# जालन्यात खेळाडूंसाठी स्टेडियम बांधावे; मॅरेथॉनपटू जितेंद्र अग्रवाल यांची मागणी


आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** जालना जिल्ह्यातून आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू निर्माण होण्यासाठी येथे सुसज्ज व सर्व सुविधांनी युक्त स्टेडियम बांधावे, अशी मागणी येथील मॅरेथॉनपटू जितेंद्र अग्रवाल यांनी केली.

दक्षिण आफ्रिकेतील डर्बन येथे 87 किलोमीटरची कॉम्रेड्स मॅरेथॉन 9 जून रोजी यशस्वीरित्या पूर्ण करून ते भारतात परतले आहेत. त्यानंतर एका पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

दक्षिण आफ्रिकेत मॅरेथॉनसाठी जाणारे व ती पूर्ण करणारे जितेंद्र अग्रवाल हे जालन्यातील पहिले धावपटू ठरले असून त्यांच्यामुळे इतर धावपटूंनाही प्रेरणा मिळाली आहे. ते म्हणाले की, जालना शहरात राजकीय नेतृत्वाने मनावर घेऊन सर्व खेळांसाठी सुसज्ज व सर्व सुविधांनी युक्त भव्य स्टेडियम बांधले तर येथील खेळाडू जगात नावलौकिक गाजवतील. या वेळी जितेंद्र अग्रवाल यांनी नवीन खेळाडूंना मोलाचे मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, कुठल्याही खेळाचा सराव करताना आहारतज्ज्ञ व प्रशिक्षक यांचे मार्गदर्शन घेणे आवश्यकच आहे. त्याशिवाय सराव करणे म्हणजे स्वतःला संकटात टाकण्यासारखे आहे. ते स्वतः सातार्याचे प्रशिक्षक शिव यादव यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करतात. मॅरेथॉनमध्ये धावण्यासाठी केवळ धावण्याचा सराव करणे पुरेसे नसते. सायकलिंग, पोहणे व जिममध्ये जाऊन व्यायाम करणे हे सुद्धा आवश्यक असते. धावताना आपल्या हृदयाचे ठोके, रक्तदाब इत्यादी मोजणारे स्मार्ट वॉच खेळाडूच्या हातावर असणे आवश्यक असते. ते घड्याळ खेळाडूला सावध करते. दक्षिण आफ्रिकेतील मॅरेथॉनसाठी पात्र व्हायचे असेल तर आपापल्या देशात सहा महिने आधी कुठलीही पूर्ण 42 किलोमीटरची मॅरेथॉन 4 तास 50 मिनिटात पूर्ण करणे आवश्यक असते. त्यांनी स्वतः पुणे व मुंबई येथे अशा तीन मॅरेथॉन पूर्ण केल्या होत्या आणि त्यांचे प्रमाणपत्र डर्बनला पाठवले होते.

दक्षिण आफ्रिकेतील अनुभव सांगताना अग्रवाल म्हणाले की, आम्ही तेथे दुबईमार्गे विमानाने पोहचलो.




समुद्रकिनार्यावरील डर्बन हे अतिशय सुंदर शहर आहे. तेथे ही अल्ट्रा कॉम्रेड्स मॅरेथॉनची परंपरा 1920 पासून सुरू आहे. अत्यंत प्रतिष्ठित अशी ही स्पर्धा असल्यामुळे तेथे नागरिकांमध्ये राष्ट्रीय महोत्सवासारखे अत्यंत उत्साहाचे वातावरण असते. तेथील भारतीय दूतावासात आम्ही गेलो असता त्यांनी आम्हाला मोलाचे सहकार्य केले. प्रत्यक्ष मॅरेथॉनमध्ये 23 हजार लोक धावतात. त्यामुळे मॅरेथॉनच्या दिवशी सकाळी 5.30 वाजता रस्त्यावर किमान पंधरा किलोमीटरपर्यंत धावपटूच दिसतात. पूर्ण 87 किलोमीटर रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी धावपटूंना प्रोत्साहन देणारे लोक स्वतःहून खाद्यपदार्थ व इतर मदत करतात. येथे भारतीय लोक मोठ्या संख्येने आहेत. ते आमच्या टीशर्टवरील तिरंगा पाहून अत्यंत जोषात आमचे स्वागत करत होते. या वर्षी पहिल्यांदा भारतीय दूतावासानेही येथे आपला स्टॉल लावून धावपटूंना आवश्यक सामग्री पुरवली. मॅरेथॉनमध्ये धावताना अधूनमधून पाणी पीत राहणे आवश्यक असते. घामातून क्षार जात असल्याने मीठ लावलेले बटाटे खाणे व साखरेची पातळी राखण्यासाठी कोक योग्य प्रमाणात पिणे आवश्यक असते. तरीही 60 किलोमीटरनंतर तुम्ही केवळ यंत्रासारखे धावता. तुम्हाला शरीराचे भान राहत नाही. अशा वेळी मानसिक बळावरच ही स्पर्धा पूर्ण करावी लागते. बारा तासांच्या आत ही स्पर्धा पूर्ण करणार्यांना पदक मिळते. अग्रवाल यांनी 11 तास 42 मिनिटांत ही मॅरेथॉन पूर्ण केली. या वर्षी नेदरलँडच्या धावपटूने केवळ 5 तास 25 मिनिटांत ही स्पर्धा पूर्ण करून 25 लाखांचे पहिले पारितोषिक पटकावले अशीही माहिती जितेंद्र अग्रवाल यांनी दिली. 1800 मीटर सतत चढ असणारी ही मॅरेथॉन पुढच्या वर्षी तितक्याच उताराची असेल आणि त्यासाठीही तयारी करणार आहे, असा निर्धारही अग्रवाल यांनी व्यक्त केला.

# शिर्डी शहरातून ७२ वर्षीय वृद्ध बेपत्ता

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** शहरात गेल्या अनेक वर्षापासून राहात असलेले उमरुद्दीन इसा अन्सारी वय ७२ राहणार पुनमनगर येथे राहतात ११ जून रोजी सकाळी ११.३० वाजता त्यांना बिहार येथे गावाकडे जायचे असल्याने शिर्डी ते मनमाड पर्यंत बुकिंग असल्याने त्यांना रेल्वे कमानीजवळ सोडले होते ते घरी गेले नाही. गावाकडेही पोहोचले नसल्याने त्यांचा शोधाशोध केल्यानंतर दिसून आले असून माझे चुलते उमरूद्दीन इसा अन्सारी हे बेपत्ता झाल्याची मिसिंग पुतण्या मोहम्मद अली मोहम्मद इद्रीस अन्सारी पुनमनगर शिर्डी यांनी दिली असून चेहरा गोल रंगाने सावळा शरीर मध्यम उंची पाच फूट केस सफेद काळे अंगात पांढरा शर्ट असा पेहराव असून कोणाला मिळून आल्यास शिर्डी पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले.



शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा
सुका मेवा
मसाले
क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू
स्टीलच्या वस्तू
ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे
साफ सफाईचे सर्व साहित्य
आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर